माणूस

शनिवार । १७ फेब्रुवारी १९७९ । ७५ पैसे

# गजेन्द्राचं वैभव गेलं



शंकराचार्यांनी 'चित्रपटसम्राट' म्हणून गौरवलेले मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते श्री. राजा परांजपे यांचं गेल्या आठवड्यात पुण्यामध्ये निधन झालं. (दि. ९ फेब्रुवारी)

एकाहून एक सरस चित्रपटांमधून मराठी प्रेक्षकांसमोर आलेले राजाभाऊ आजही मराठी मनाला भुरळ पाडतात. राजाभाऊंनी पंचवीस मराठी व सहा हिंदी चित्रपटांचं दिग्दर्शन केलं. पंच्याहत्तर चित्रपटात कामं केली आणि पंचवीस नाटकांमधून हजारांवर भूमिका केल्या. 'पाठलाग' या राजाभाऊंच्या चित्रपटाची आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवासाठी निवड झाली होती. तसंच 'जगाच्या पाठीवर' या चित्रपटाचे उत्कृष्ट निर्माते, दिग्दर्शक आणि कलावंत म्हणून रसरंग फाळके पारितोषिकही राजाभाऊंनी पटकावलं होतं.

वैकुंठ स्मशानभूमीवर राजाभाऊंना श्रद्धांजली वाहताना नुकत्याच सावंतवाडी येथे झालेल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. भालबा केळकर म्हणाले,
'वर्ष-दीड वर्षापूर्वीच अण्णा माडगुळकरांचं निधन झालं आणि आज राजा परांजपेही आपल्याला सोडून गेलेले आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतील या दोन मातब्बर व्यक्तींच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टीचं गजेन्द्राचं वैभव आता पूर्णपणे नष्ट झालं आहे.'
प्रसिद्ध निर्माते दिग्दर्शक श्री. राम गबाले यांनी सांगितलं की, 'मा. विनायकांनंतर मराठी चित्रपटसृष्टीत राजाभाऊंइतकं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व निर्माणच होऊ शकलं नाही!'

राजाभाऊंचं अंत्यदर्शन घेण्यासाठी बाहेरगावाहूनही माणसं आली होती. पी. आनंद हे असेच एक कोल्हापूरच्या स्टुडिओतील आर्टिस्ट. राजाभाऊंचे मोठे चाहते. त्यामुळेच त्यांना भावनावेग आवरता आला नाही. राजाभाऊंचं शव विद्युद्दाहिनीत ठेवलं गेल्यानंतर हा साठीच्या आसपासचा कलाकार बेभान होऊन धावत सुटला आणि खालच्या बाजूला जळत असलेल्या एका चितेसमोर उभं राहून त्याने हंबरडा फोडला!

आता राजाभाऊंचे प्रत्यक्ष दर्शन होणार नाही; पण जगाच्या पाठीवर ऊन-पाऊस झेलत हा माझा मार्ग एकला असं म्हणत लाखाची गोष्ट सांगणारे हे पेडगावचे शहाणे अजूनही मराठी रसिकांचं मन रिझवतील आणि त्यांचं ते दर्शन अधिक मनोहारीही असेल!

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे–अंक अडतिसावा**

**१७ फेब्रुवारी १९७९**

**मूल्य ७५ पैसे**



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

¤


# सप्रेम नमस्कार

¤ दोन फेब्रुवारीच्या अंकात नागपूरचे श्री. लेले यांचे 'रचनात्मक काम' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेले पत्र वाचले. त्यांच्या 'कोपरखळी' शी नसलो तरी पत्राच्या मूळ विचाराशी मी सहमत आहे. युवा संघटनांची रचनात्मक कामासंबंधी पुष्कळशी अनावस्था आहे, हे खरे आहे. ते एक काम महत्त्वाचे मानून पुढे गेले पाहिजे. त्यांच्या पुढे जाऊन मी असे म्हणेन संघर्ष वाहिनीचे काम मुळात रचनात्मक आहे. ज्या भावी समाजाची सुंदर उभारणी आम्हाला करायची, त्याची सुरुवात म्हणजे रचनात्मक काम असे आम्ही मानतो; परंतु या उभारणीत, ही जड व्यवस्था आम्हाला सहयोग करणे तर दूरच राहिले, चिरडून टाकायचा प्रयत्न करीत असते. ही अपरिहार्य स्थिती वाहिनीसारख्या संघटनांना संघर्षप्रवण करते.

जयप्रकाशजी गेली अनेक वर्षे लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचा अधिकार घटनेत नमूद करा असे सांगत आले. बिहार आंदोलनाने हा प्रश्न अधिक तीव्र केला होता. गुजरात सरकार भंग करण्याची मागणी घेऊन मोरारजीभाई उपोषणाला बसले होते. आणीबाणीच्या काळात हा अधिकार असणे किती आवश्यक आहे याची प्रत्येक सुजाण नागरिकाला प्रचिती आली. ७७ च्या ऐतिहासिक लोकसभा – निवडणुकीच्या वेळेस जनता पार्टीने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात हा अधिकार देण्याविषयी नमूद करण्यात आले होते. तथाकथित दुसरे स्वातंत्र्य मिळून दोन वर्षे झाली असतानादेखील हा अधिकार जनतेला मिळू नये? वर पंतप्रधानाच्या खुर्चीवर असलेले मोरारजीभाई म्हणाले 'नाही देता येत!'

वर्धा-निदर्शनाच्या वेळेस प्रसिद्ध केलेल्या पत्रकात स्पष्ट लिहिले होते, 'आम्हाला निदर्शनाची हौस नाही; परंतु...'मग निदर्शनाची भूमिका स्पष्ट केली होती.

श्री. लेले यांना कदाचित माहीत नसावे आणीबाणीनंतर म्हणजे आज देखील, बिहार मध्ये वाहिनी काय करते आहे ते. तुर्कीचा महंत शेकडो एकरांचा मालक आहे. वाहिनीचे कार्यकर्ते मजुरात राहून मजुरांबरोबर उभे आहेत. बोधगयाचा महंत ऐकून असाल. प्रचंड संख्येने असलेल्या हरिजन मजुरांचे संघटन संघर्ष वाहिनी करीत आहे. रचना-संघर्ष सध्याच्या स्थितीत समांतर जाणार आहे. कारण रचनेला व्यवस्था विरोध करते आहे. बिहारमध्ये जे. पींच्या मार्गदर्शनाखाली संघर्षवाहिनी हीच संघटना 'रचनात्मक संघर्षात' आहे.

महाराष्ट्रात वाहिनीचे वय अवघ्या दोन वर्षांचे! काही नाही झाले; परंतु धडपड त्या दिशेने आहे. मुंबईच्या शेजारी बेवजी या गावात शुभा ही मुलगी व तिच्याबरोबर चार-पाच युवक-कार्यकर्ते खेड्यांत राहून काम करीत आहेत. मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात सुभाष निंबाळकर, वसंत पात्रे हे युवक रोजगार हमीच्या संदर्भात निलंगा तालुक्यात काम करीत उभे आहेत. मराठवाडा हिंसाचाराच्या वेळेस संघर्षवाहिनी आपली सर्व शक्ती घेऊन दलितांच्या बाजूने उभी राहिली. अमरावती जिल्ह्यात किशोर देशपांडे सावळा या ग्रामपरिसरात काम उभे करीत आहे तर मी व देविदास अंबाजोगाई परिसरातील १४ गावांचा एक प्रकल्प करून काम सुरू केले आहे. जळगावला वासंती, शेखर रचनात्मक संघर्षाच्या धर्तीवर काम करीत आहेत हे श्री. लेले यांना माहीत नसावे. ते स्वतः नागपूरचे आहेत. शिवाजीनगर झोपडपट्टीत संघर्ष-वाहिनीचे काम चालले आहे हे त्यांना माहीत असावे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघर्षवाहिनी यांच्या वैचारिक निष्ठेतच विरोध आहे. त्यामुळे कार्यपद्धतीतही भिन्नता आहे.

शेवटी एकच लिहून हे पत्र संपणार आहे. वाहिनीच्या नावात संघर्ष आहे म्हणून वाहिनी संघर्ष करते किंवा ती त्याचा मक्ता आपला आहे असे मानते ही विधाने प्रतिक्रिया लिहिण्यासारखी नाहीत.

पण आपण 'संघर्ष' म्हटला की एवढे का

घाबरतो बरे ? स्मशानशांतता कशाला हवी ? जे. पी.च सांगतात, व्यवस्था बदलायची असेल तर संघर्ष करावा लागेल. त्यांनी तर चक्क वर्गसंघर्ष सांगितला आहे.

वर्ध्याला संघर्षवाहिनीच्या युवकांनी वैशिष्ट्यपूर्ण निदर्शने करून या व्यवस्थेबद्दल नकार घोषित केला आहे आणि नवीन व्यवस्थेकडे इंगित केले आहे.

७ फेब्रुवारी **अमीर हबीब,**
संयोजक, महाराष्ट्र संघर्षवाहिनी
मु. पो. अंबाजोगाई, जि. बीड

## एन्. एस्. एस्. शिबिर

□ १९६८ साल असावं.

'जीवन शिक्षण मंदिरा'तले आम्ही चार-सहा विद्यार्थी गेरूची आणि चुन्याची डबडी घेऊन गुरुजींच्याबरोबर फिरायचो.

आम्ही चुन्यानं भिंती रंगवायचो.

गुरुजी सुंदर अक्षरात लिहायचे–

'विद्या विनयेन शोभते'

'अज्ञानासारखा शत्रू नाही'

'विद्येसारखे दैवत नाही'

विद्येची महती सांगणारी अशी किती तरी सुभाषितं आम्ही गावात रंगवली होती.

आमच्या गावचा 'ग्रामगौरव' होणार होता.

त्याला कारणही खास होतं.

आमचं सगळं गाव साक्षर झालं होतं.

'ग्रामगौरवा'च्या दिवशी चार-दोन मंत्री आले. सजवलेल्या बैलगाडीतून ढोल, लेझीमच्या घोषात त्यांची गावातून मिरवणूक काढली होती. त्यानंतर समारंभ–

एका साक्षर महिलेनं म्हटलेलं स्वागतगीत.

सात-आठ प्रौढसाक्षरांनी वाचून दाखवलेला एक धडा. 'कमल नमन कर.'

त्यानंतर सगळं गाव साक्षर झाल्याची सरपंचांनी केलेली छातीठोक घोषणा आणि कौतुकभरल्या चेहऱ्यानं मंत्र्यांनी दिलेली शाबासकी त्या काळात सगळ्याच गावांचे असे 'ग्रामगौरव' झाले असे म्हणतात.

आणि तरीही १९७८ साली पुन्हा सुरू झालेली 'प्रौढ शिक्षण मोहीम.'

सगळं गाव लिहिते–वाचते झाल्यावरसुद्धा गावानं गावकरी कागद लिवायला अन् वाचायला आमच्या गुरुजींकडे का यायचे हे तेव्हा मला समजले नव्हते.

पण दिल्लीला राज्य बदलले, सत्ताधिशांचा खांदेपालट झाला आणि त्यांनीही परत 'प्रौढ शिक्षण मोहिम' राबवायचं ठरवलं.

तेव्हा कुठे माझ्या लक्षात आले– सरपंचाची छातीठोक घोषणा, मंत्र्याची कौतुकभरली शाबासकी आणि गावचा गौरव, सगळीच चक्क फसवेगिरी होती !

आणि आता परत एकदा सरकारने 'शहाणे करून सोडावे सकळ जन' असा निश्चय केलाय !

'निरक्षरता हा माणसाचा सगळ्यात मोठा शत्रू आहे, राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या व्यापक संदर्भामध्ये विचार करताना सामाजिक प्रगतीसाठी, उन्नतीसाठी निरक्षरता हटलीच पाहिजे !' असा नारा केव्हाच सुरू झालाय.

सरकारनं मुहूर्तही छान शोधला– २ ऑक्टोबर ७८

मोर्चे काढणाऱ्या युवक संघटना, 'फॅशन परेड,' 'भिशी'च्या पार्ट्या आणि 'चेंज' म्हणून समाजसेवा (?) करणारी महिला मंडळं, 'छपरावर शेती' करणाऱ्या कृषिपंडितांसारख्या सामाजिक संस्था, संघटना रिंगणात उतरल्या आहेत. मग या योजनेच्या यशाबद्दल काय बोलावं !

स्वीकारलेलं काम पार पाडण्याबद्दल आर. एस्. एस्. ची ख्याती. तेव्हा सरकारने या योजनेसाठी संघाची मदत मागितली होती.

संघानंही देऊ केली.

पण विघ्नसंतोषी लोकांच्या पोटात शूळ उठला–

'संघाची शैक्षणिक क्षेत्रात घुसखोरी' अशी हाकाटी सुरू झाली.

आमचं खंबीर (?) सरकार नमलं.

संघाची मदत नाकारण्यात आली.

तर अशी ही २ ऑक्टोबर ७८ ला सुरू झालेली 'प्रौढ शिक्षण योजना'

नुकतीच या योजनेची प्रगती प्रत्यक्ष बघायला मिळाली–

महिन्यापूर्वी आम्ही चार मित्र भंडारदरा, कळसूबाई, हरिश्चंद्रगडाची सैर करायला गेलेलो.

या सफरीतला एक दिवसाचा मुक्काम कळसूबाईच्या पायथ्याच्या बारी गावात ठोकला होता. आदिवासी अकोले तालुक्यातले, पन्नास-पाउणशे उंबऱ्याचं चित्रातल्यासारखं डोंगरात दडलेलं हे हिरवं गाव. सगळी गावकरी मंडळी सकाळी उठून आपल्या कामधंद्याला चालू लागायची ती संध्याकाळी परतायची– दिवसभर गावात एखादा-दुसरा म्हातारा आणि चार-दोन पोरांचं अस्तित्व.

तर अशा बारी गावातल्या मैलभर अंतरावरच्या 'डाकबंगल्या'त एका कॉलेजच्या एन्. एस्. एस्. (राष्ट्रीय सेवा योजना) च्या विद्यार्थ्यांनी आठ दिवसांसाठी डेरा टाकलेला.

विद्यार्थी मोजून दीडशे– बरोबर चार प्राध्यापक.

'प्रौढ शिक्षण योजने'च्या प्रसार-प्रचारासाठी त्यांनी बारी गाव निवडलेले. सकाळी आठनंतर यांचा दिवस सुरू व्हायचा.

सकाळचे चहा-खाणे आटोपून हे विद्यार्थी 'प्रौढ शिक्षण योजने'चा अंतर्गत सर्व्हे करायला बाहेर पडायचे आणि दमून-भागून संध्याकाळी डेरेदाखल व्हायचे.

पन्नास–पाउणशे उंबऱ्याच्या, दिवसभर शुकशुकाट असलेल्या या गावात हे दीडशे विद्यार्थी प्रौढ शिक्षण योजनेचा जोरदार प्रचार–प्रसार करायचे !

(बारीच्या जवळच आल्हाददायक भंडारदरा आणि पाठीशी सह्याद्रीचं उंच शिखर कळसूबाई आहे.)

तर अशी ही 'प्रौढ शिक्षण योजने'ची जनता राज्यातील यशस्वी घोडदौड !

आणि एन्. एन्. एस्. च्या या 'यशस्वी शिबिरा'च्या 'किरकोळ' खर्चाविषयी कशाला बोलायचं !

३ फेब्रुवारी **विनय गुणे, संगमनेर**

## प्रीमियरची कहाणी

□ २० जानेवारी ७९ चा 'माणूस'वाचला. 'मुंबई वार्ता' या सदरात 'कामगार अशांतता' हा विषय घेऊन आपण मजूरमंत्री सुशिलकुमार शिंदे यांची मुलाखत छापली आहे. कशी छान आहे मुलाखत नाही ? एकदम मंत्रीछाप उत्तरे. एखाद्या सुप्रसिद्ध सिनेनटाची अथवा नटीची मुलाखत अशीच असते. एकदम गुळगुळीत. गुळमुळीत अपेक्षित सवाल अन् त्यांचे अपेक्षित जबाब. असो.

मुद्दाम पत्र लिहिण्याचा प्रपंच करण्याचे प्रयोजन म्हणजे या मुलाखतीत प्रीमियरचा म्हणजेच मुंबईच्या कुर्ला उपनगरातील 'प्रीमियर ऑटोमोबाइल्स' या प्रमुख कार-

खान्यात चालू असलेल्या टाळेबंदीचा उल्लेख. मुलाखतीत शेवटी शेवटी मजूरमंत्र्यांनी 'प्रीमियर–प्रकरणी योग्य वेळी सरकार हस्तक्षेप करील' असे म्हटले आहे आता योग्य वेळी म्हणजे कधी, हे ब्रह्मदेवच जाणे; कारण प्रीमियरमध्ये १६ डिसेंबर ७८ पासून टाळेबंदी सुरू झाली. ही टाळेबंदी संपावी म्हणून सरकार पंचांग हातात घेऊन मुहूर्त पहात आहे काय? गंमतीची गोष्ट म्हणजे संपादकीयामध्ये आपण या मुलाखतीचा ओझरता उल्लेख केला आहे व 'ही मुलाखत शासनाचा हिंसाचाराशी मुकाबला करण्याचा निर्धार व्यक्त करणारी आहे' अशी भलावण केली आहे.

शहादे येथील आदिवासींवरील अत्याचार, जवाहरलाल दर्डा प्रकरण, कानपूरच्या स्वदेशी मिल्समधील हत्याकांड वगैरे प्रकरणांत निःस्पृह व रामशास्त्री बाण्याची 'माणूस'ची ज्वलंत पत्रकारिता कोठे गेली प्रीमियर प्रकरणात?

प्रीमियरची संपूर्ण कहाणी ऐकण्यासारखी आहे.

प्रीमियर ऑटोमोबाईल्स हा कारखाना जरी २३ नोव्हें. ४४ साली स्थापन झाला असला तरी 'मोटर कारखाना' म्हणून ५४–५५ साली बिरुद मिरवू लागला; कारण ५४–५५ पासूनच्या इटलीच्या जगप्रसिद्ध 'फियाट' कंपनीकडून परवाना मिळून भारतात प्रीमियरमध्ये फियाट मोटारी (कार्स) तयार होऊ लागल्या. त्याच सुमारास क्रायस्लर कॉर्पोरेशन या अमेरिकन कंपनीबरोबर केलेल्या करारानुसार डॉज व फार्गो या ट्रक्स/बसेस प्रीमियरमध्ये बनू लागल्या.

प्रीमियरमध्ये युनियन अशी ५७ साली सुरू झाली. राम देसाई, अशोक मेहता, आर. जे. मेहता असा नेतृत्वाचा प्रवास होऊन शेवटी आर. जे मेहता यांच्या नेतृत्वानेच अद्यापपावेतो 'इंजिनियरिंग मजदूर सभा' या झेंड्याखाली प्रीमियर कामगारांना एकत्र ठेवले.

सर्व कर्मचारी (कामगार, ऑफिसस्टाफ व सुपरवायजरीस्टाफ) जरी आर. जे. यांच्या पाठीमागे एकदिलाने उभे होते तरी मॅनेजमेंट मात्र आर..जे. ला मान्यता देण्यास तयार नव्हती; कारण एकच, कंपनीला मुख्य म्हणजे युनियनच नको होती व असली तर ती टाटाखालचे मांजर बनणारी युनियन पाहिजे होती. आर. जे. या गोष्टीला कधीच कबूल होणार नव्हते.

शेवटी कंपनीने जी. पी. गलगली या शठजींच्या (लालचंद हिराचंद) अत्यंत विश्वासू माणसामार्फत आपला बेत तडीस नेला व गलगली यांची मालकधार्जिणी युनियन (अर्थातच इंटकचे कुंकू लावून) सुरू झाली.

पण काही केल्या ही युनियन बाळसे धरीना. गलगली कंपनीत नोकरीला असूनसुद्धा दहा टक्के कामगारसुद्धा या युनियनचे सभासद होईनात. शेवटी मॅनेजमेंट वैतागली. कारण रोज फक्त १६ कार्स निर्माण होत होत्या. (१९६२ मध्ये) कंपनीला कमीतकमी ३० कार्सचे उत्पादन पाहिजे होते व हे उत्पादनवाढीचे काम गलगलींच्या युनियनकडून होणे शक्य नाही हे पाहून कंपनीने १९६५ मध्ये आर. जे. मेहतांच्या 'इंजिनियरिंग मजदूर सभा' या युनियनला मान्यता बहाल केली. आर. जे. नी सुद्धा कर्मचाऱ्यांचा व्यवस्थित फायदा करून देणारा करार १९६५ मध्ये केला व कंपनीला उत्पादन देणाऱ्या इंसेंटिव्ह कराराचा जन्म झाला.

१९६५ गेले, ६६ गेले, ६७ गेले. आता कंपनीने आपला मतलब साध्य करून घेतल्यामुळे आर. जे. यांची उपयुक्तता संपली. कंपनीने ६७ मध्ये आर. जे. मेहतांच्या इंजि. मज. सभेची मान्यता काढून घेतली व आपल्या नेहमीच्या भाडोत्री युनियनला–गलगली युनियनला– मान्यता दिली.

या वेळेस मात्र गलगली आणि कंपूला कळून चुकले की, सरळ मार्गाने कामगार आपले जन्मात सभासद होणार नाहीत. याकरता साम, दाम, दंड, भेद वगैरे सर्व उपाय वापरले पाहिजेत. कंपनीने तर गलगलींना 'फ्री हँड' दिलाच होता. झाले. विरुद्ध युनियनच्या म्हणजे आर. जे. मेहता युनियनच्या सदस्यांना वेचून वेचून त्रास देण्याचा कार्यक्रम सुरू झाला. शेकडो लोकांना सस्पेंड करण्यात आले. शेवटी भीतीनेच का होईना, कामगार भाडोत्री युनियनचे सदस्य बनले. होय, भीतीनेच. कारण कोणत्याही, सहकारी सोसायटी अगर वर्क्स कमिटी निवडणुकीत गलगली युनियनच्या उमेदवाराचा पराजय पक्का. गलगलींना तर वर्क्स कमिटी निवडणुकीत एका साध्या भैय्याने पाडले.

दहशतवादाने सभासदसंख्या वाढवून गलगलींनी कोर्टामार्फत (युनियन मान्यता कायदा १९७५ अन्वये) ऑगस्ट १९७८ मध्ये मान्यता मिळवली व तेव्हा मात्र गलगली कंपूला आकाश ठेंगणे झाले. निरनिराळ्या मार्गाने पैसा उभा करण्याचे बेत शिजू लागले. मुख्य हेतू जमेल त्या मार्गांनी आपले (युनियनच्या बुरख्याआडून) खिसे भरण्याचा होता. सप्टेंबरमध्ये युनियनने फतवा काढला की, प्रत्येक कामगाराने आपल्या पगारातून १०१ (रु. एकशे एक) युनियनच्या बिल्डिंगफंडाला स्वखुशीने (?) द्यावे. सक्ती सुरू झाली.

आता मात्र सर्व कामगार एकदिलाने डॉ. दत्ता सामंत यांच्याकडे गेले व आपले गाऱ्हाणे मांडले. सर्व विचार केल्यावर डॉ. सामंतांनी प्रीमियरमध्ये स्वतःची युनियन सुरू करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार गेट मीटिंग घेतली.

कामगारांनी या नव्या युनियनला न भूतो न भविष्यति असा प्रतिसाद दिला व दोन आठवड्यांच्या आत ९० टक्के कामगार सामंत युनियनचे सदस्य बनले.

झाले. गलगली कंपू चिडला (व मॅनेजमेंटही चिडली) आपले दुकान बंद करावे लागणार हे ओळखून मारामाऱ्या सुरू झाल्या. त्याचे पर्यवसान म्हणजे सामंत युनियनचा तरुण जन. सेक्रेटरी वार्डे याचा खून! अन्यायाविरुद्ध पेटून या ३४ वर्षीय तरुणाने सामंत युनियनचे जन. सेक्रेटरीपद स्वीकारले व एक बिनीचा कार्यकर्ता म्हणून तो ओळखला जाऊ लागला; परंतु त्याची हत्त्या झाली.

या हत्येच्या मागे कोण आहे हे सांगायला कोणा ज्योतिष्याची गरज नाही. या खुनाच्या निषेधार्थ कामगारांनी उत्पादन ७४ वरून ४० वर आणून ठेवले.

परिणामतः कंपनीने लॉक आऊट जाहीर केला. महाराष्ट्र सरकारचे रोजचे ३॥ लाख रुपये नुकसान विक्रीकराचेच होत आहे.

तरी संपादकसाहेब कृपया, आपला प्रतिनिधी पाठवा व सत्य परिस्थिती 'माणूस'–मध्ये छापा.

४ फेब्रुवारी **शरद गो. कुंटे, मुंबई**

[मंत्र्यांनी निर्धार व्यक्त करणारी मुलाखत दिली, 'माणूस'ने ती प्रसिद्ध केली. संपादकीयात या निर्धाराची ओझरती भलावण झाली, यामुळे 'माणूस'च्या तुम्ही निर्देशिलेल्या शहादे-दर्डा कानपूर या निःस्पृह पत्रकारितेला कसा काय ढळ पोचतो ते ध्यानात येत नाही. का मंत्र्यांच्या मुलाखतीच छापू नयेत असे तुमचे मत आहे? बरं, मंत्री म्हटले की ते मंत्र्यासारखेच बोलणार, सावध विधाने करणार हेही उघड आहे. तुम्ही पाठवलेली प्रीमियरची कहाणी कोणत्या तरी दडपणामुळे 'माणूस'ने छापली नसती तरच तुमची शंका रास्त ठरली असती. – सं.]

## मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

## □ मुंबई वाचवा !

जागतिक कीर्तीचे स्थापत्यविशारद आणि नगररचनाशास्त्राचे अभ्यासक, लंडनचे श्री. रॉबर्ट शॉ सध्या मुंबईत आहेत. गेली तीस वर्षे ते लंडन महापालिकेचे नगररचना-सल्लागार म्हणून काम करीत होते. वाढत्या शहरांचे नियोजन हा त्यांचा आवडता विषय असून या संदर्भातील त्यांची सूक्ष्म दृष्टी व चिकित्सक वृत्ती यांचे प्रत्यंतर सेव्ह बॉम्बे कमिटी व ब्रिटिश कौन्सिलच्या संयुक्त विद्यमाने आयोजिण्यात आलेल्या त्यांच्या व्याख्यानात आहे.

'सेव्हिंग द सिटी, द लंडन एक्सपीरियन्स' या विषयावर बोलताना श्री. शॉ म्हणाले की, मुंबईत वास्तुशिल्पाचे अप्रतिम नमुने आहेत. किंबहुना अशा सुंदर वास्तुशिल्पांची हे शहर म्हणजे एक खाणच आहे. मुंबईचा पसारा वाढत असतानाही ही ऐतिहासिक ठेव जतन करून ठेवणे आवश्यक आहे. या शहरात गगनचुंबी इमारतींचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे व नागरी सुविधांवर त्याचा प्रचंड ताण पडत आहे. हे वेळीच रोखले नाही तर त्याचे भयानक दुष्परिणाम मुंबईकरांना भोगावे लागतील.

मुंबईतील वाहतूक-समस्येवर श्री. शॉ यांनी, विशेषतः दक्षिण मुंबईतील, गजबजाटाच्या भागासाठी 'पादचारी मार्गांची' कल्पना सुचविली आहे. मुळात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांपैकी काही रस्ते केवळ पादचाऱ्यांसाठी राखून ठेवल्यास अपघातांचे प्रमाण कमी होईल व वाहतूक कोंडीची समस्या काही प्रमाणात सुटेल असे मत श्री. शॉ यांनी व्यक्त केले.

तत्पूर्वी एका मुलाखतीत श्री. शॉ यांनी ताजमहालास मथुरेच्या तेलशुद्धीकरण केंद्रामुळे निर्माण झालेल्या धोक्याकडे केंद्र सरकारने दुर्लक्ष करू नये, असे आवर्जून सांगितले. ताजमहाल काही केवळ भारताच्या मालकीचा नाही असे सांगून ते म्हणाले की, हे वास्तुशिल्प जगातील अस्तित्वात असलेल्या सर्व इमारतींमध्ये सर्वाधिक देखणे आणि सर्वांत आश्चर्यकारक असे आहे. एकमेवाद्वितीय अशा या सौंदर्यशिल्पाची सरकारने हेळसांड करू नये असे त्यांनी मोठ्या कळकळीने सांगितले.

लंडनमध्ये पादचारीपथांची कल्पना यशस्वीपणे राबविल्याचे सांगून ते म्हणाले की, मुंबईतही असे पादचारीपथ निर्माण केले तर वाहतुकीमुळे निर्माण होणाऱ्या ध्वनि-प्रदूषणालाही आळा घालता येईल.

जुन्या इमारतींचे संरक्षण हा शॉ यांचा आवडीचा विषय. लंडनमधील १९ व्या शतकातील सर्व इमारतींची देखभाल करण्यासाठी शॉ यांनी स्वतः पुढाकार घेऊन एक ट्रस्ट स्थापन केला आहे. मुंबईतही अशी अनेक सुंदर ऐतिहासिक वास्तुशिल्पे आहेत व ती नीट जतन केल्यास प्रवाशांचे आकर्षण बनू शकतील, असे ते म्हणाले.

मुंबईतील नागरी जीवनाच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत. मुंबईच्या व्यापारी महत्त्वामुळे जवळजवळ दररोज मुंबईत माणसांची आयात होत आहे. या वाढत्या लोकसंख्येचा सर्वाधिक तीव्र फटका बसतो तो वाहतूक आणि निवासव्यवस्थेला. त्यातही घरबांधणीची समस्या अधिकच बिकट बनली आहे. रहाण्यासाठी बऱ्यापैकी वस्तीत एखादा ब्लॉक विकत घेण्यासाठी आयुष्यभराची कमाई खर्च करावी लागते, इतके भाव वाढले आहेत. नव्या घरांची टंचाई हे भाव वाढण्याचे एक मुख्य कारण आहे. साहजिकच तुरळकपणे दिसणाऱ्या जुन्या चौसोपी वाड्यांचा चेहरामोहरा बदलून त्याचे अत्याधुनिक निवासी इमारतीत रूपांतर करणे ही आजची गरज बनली आहे.

परंतु गृहनिर्माणाची वाढती गरज भागविताना गगनचुंबी इमारतींना परवानगी देणे शहाणपणाचे ठरणार नाही. अशा अनेक मजली इमारतींमुळे पाण्यासह सर्वच आवश्यक गरजा भागविण्यात अडचणी येतात. हे सर्व लक्षात घेता, सर्वच नाही तरी काही विशेष महत्त्वाच्या जुन्या इमारती पाडून तिथे नव्या टोलेजंग इमारती बांधण्याचे प्रस्ताव पालिकेने फेटाळून लावले पाहिजेत. अलीकडेच समुद्रात भराव टाकण्यास पालिकेने एकमुखी विरोध दर्शविला आहे व ही कृती स्वागतार्ह आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबईसारख्या सुंदर नगरीवर बलात्कार होत आहे, असे रॉबर्ट शॉ यांचे म्हणणे आहे. हा बलात्कार थांबविल्याशिवाय नागरी सेवा सुधारणार नाहीत व समस्या अधिकाधिक गंभीर होत जातील असा त्यांचा इशारा आहे. महाबिकट वाहतूकसमस्या, घरांची वाढती टंचाई, अकाळविकाळ वाढणाऱ्या झोपडपट्ट्या, वाढते प्रदूषण आणि औद्योगिक सामाजिक क्षेत्रातील अस्वस्थता यांच्या भाऊगर्दीत सामान्य मुंबईकर चेंगरून जात आहे. अशा सगळ्या परिस्थितीत मुंबईचा कलकत्ता होण्यापूर्वीच सरकारला काही हालचाल करता येणे शक्य आहे काय? शक्य असेल तर सरकार काही करणार आहे काय? □

## □ यशस्वी संमेलन

गेल्या रविवारी, दि. ४ फेब्रुवारीस अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुंबई शाखेच्या वतीने मुंबई विद्यापीठ विभागातील विद्यार्थ्यांचा एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. सुमारे बाराशे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत नीटनेटकेपणी पार पडलेल्या या संमेलनाचे उद्घाटन माजी सर्वोच्च न्यायाधीश आणि शहा आयोगाचे अध्यक्ष न्या. जे. सी. शहा यांनी केले.

हे संमेलन भरविण्यामागे जी अनेक उद्दिष्टे होती, त्यांपैकी एक मुंबई विद्यापीठातील अंदाधुंदीच्या परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांचे मत जाणून घेणे व या समस्येची चर्चा घडवून आणणे हे होते. या पार्श्व-

पृष्ठ २१ वर

# खांडवा निवडणूक

## जागा जिंकली पण पाठिंब्यात घट

वा. दा. रानडे

मध्यप्रदेशातील दोन पोटनिवडणुका जनता पक्षाने जिंकल्या. एक खांडवा लोकसभा जागेची आणि दुसरी चंपा विधानसभा जागेची. हिंदी भाषिक पट्ट्यात जनता पक्षाचा प्रभाव घटत चालला असला तरी निवडणुका हरण्याइतका तो कमी झालेला नाही, हे या दोन निकालांनी पुन्हा एकदा दिसून आले. चंपा विधानसभा-जागा तर जनता उमेदवाराने अवघ्या ४८४ मतांच्या आघाडीने जिंकली; पण ही जागा जून १९७७ च्या निवडणुकांत कांग्रेसने जवळ जवळ ४७०० मतांच्या आघाडीने जिंकली होती हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे दोन्ही काँग्रेस पक्षांनी या दोन निवडणुकांपुरती एक आघाडी केली होती. चंपाची जागा काँग्रेसने जून १९७७ मध्ये जिंकली असल्याने काँग्रेसनेच ती लढवावी आणि इंदिरा काँग्रेसने त्यांच्या उमेदवारास पाठिंबा द्यावा त्याच्या बदली खांडव्याची लोकसभा जागा इंदिरा काँग्रेसने लढवावी व काँग्रेसने त्यांच्या उमेदवारास पाठिंबा द्यावा असा समझोता त्यांच्यात झालेला होता. दोन्ही काँग्रेस पक्षांनी आपले बळ एकवटूनही काँग्रेसला या दोनपैकी एकही जागा जिंकता आली नाही हे खरे; पण जनता पक्षाचाही प्रभाव घटत आहे ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावयास हवी.

चंपापेक्षा खांडव्याच्या लोकसभा निवडणुकीने अधिक लक्ष वेधून घेतले. पोटनिवडणुकांत साधारणपणे मतदान कमी होते, लोकांना मतदानाबद्दल उत्साह नसतो हा नेहमीचाच अनुभव; पण खांडव्यात मतदारांनी या वेळी ६८ टक्के मतदान करून गेल्या चार निवडणुकांतील मतदानाचा उच्चांक केला हे पुढील आकड्यांवरून दिसून येईल.

खांडवा लोकसभा निवडणूक
चार निवडणुकांतील मतदान

| | |
|---|---|
| १९६७ | ६२·२४ |
| १९७१ | ६२·२४ |
| १९७७ | ६३ |
| १९७९ | ६८ |

मतदारांचा उत्साह वाढला; पण जनता पक्षास असलेल्या पाठिंब्यात वाढ होण्याऐवजी घटच झाली. १९७७ ची निवडणूक जनता पक्षाने ५४ हजार मतांच्या आघाडीने जिंकली होती. या वेळी ही आघाडी ३८ हजारापर्यंत खाली आली. कुशाभाऊ ठाकरे यांच्यासारखा वजनदार नेता उभा करूनही जनता पक्ष आपली मतांची आघाडी वाढवू शकला नाही हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

जनता पक्षाचा उमेदवार १९७७ च्या निवडणुकीत ५४ टक्के मते मिळवून विजयी झाला होता. या वेळी त्यास ४८ टक्के मते मिळाली. म्हणजे मतदानाच्या प्रमाणात सहा टक्के घट झाली. पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते जनता उमेदवार मिळवू शकला नाही. काँग्रेसच्या मतांच्या प्रमाणात वाढ झालेली नाही. किंचित घटच आहे. १९७७ मध्ये काँग्रेसने ४१·२३ टक्के मते मिळविली होती. या वेळी ४१·१६ टक्के मिळाली. ही घट विचारात घेण्याइतकीही नसून काँग्रेसला असलेला पाठिंबा जवळजवळ टिकून आहे असेच म्हटले पाहिजे. १९७७ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडलेली नव्हती. या वेळी फूट पडली असली तरी दोन्ही पक्षांनी सहकार्याने निवडणूक लढविली होती, तेव्हा इंदिरा काँग्रेस उमेदवाराला पडलेली मते ही केवळ इंदिरा काँग्रेसची नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे.

गेल्या चार निवडणुकांचा तुलनात्मक विचार केल्यास पक्षबळात पडत असलेल्या फरकाची अधिक स्पष्ट कल्पना येईल. जनसंघाचे बळ या मतदारसंघात वाढत गेलेले आहे. १९५२ मध्ये जनसंघास २१·५१ टक्के मते होती. नंतरच्या निवडणुकांत त्याला पाठिंबा वाढत गेला आणि १९६७ मध्ये त्यांच्या उमेदवाराने ४२·५४ टक्के मते मिळवली त्या वेळी जनसंघ अवघ्या १७०० मतांनी निवडणूक हरला. १९७१ मध्ये इंदिरालाटेच्या काळात जनसंघाला ३६·७७ टक्के मते मिळाली. म्हणजे त्यांच्या मतात ६ टक्के घट झाली. १९७७ च्या निवडणुकीचे वेळी जनसंघ जनता पक्षात विलीन झाला होता. जनता उमेदवाराने निवडणूक जिंकली त्यास ५४ टक्के मते मिळाली. या वेळी जनता पक्षाने जागा टिकविली; पण मतांच्या प्रमाणात ६ टक्के घट झाली.

काँग्रेसच्या मतदानाचे तुलनात्मक आकडे पाहिले तर असे दिसते की, काँग्रेसला १९६७ मध्ये ४३·१३ टक्के मते मिळाली होती. १९७१ मध्ये इंदिरालाटेच्या काळात ती पण ४८ टक्क्यांपर्यंत वाढली आणि १९७७ मध्ये ४१·२९ व १९७९ मध्ये ४१·१६ अशी त्यात घट झाली. १९६७ च्या तुलनेने काँग्रेसच्या मतात जवळजवळ दोन टक्के घट झालेली आहे. याचा अर्थ काँग्रेसचे बळ खांडवा मतदार संघात १९६७ च्या तुलनेने फार घटलेले नाही. यापेक्षाही कमी मते मिळवून काँग्रेसने काही राज्यांत बहुसंख्य जागा जिंकून सरकारही बनविलेले आहे. विरोधी शक्ती दुभंगल्याचा आणि त्यांची मते विभागल्याचा फायदा त्या वेळी काँग्रेसला मिळाला. जनता पक्षात फूट पडली तर काँग्रेसला सत्तेवर येणे अवघड जाणार नाही असेच मतदानाचे आकडे सूचित करीत आहेत.

केवळ निवडणुका जिंकल्या म्हणून आत्मसंतुष्ट न राहता आपली एकजूट टिकण्यासाठी आणि बळ वाढविण्यासाठी जनता पक्षाचे नेते घटकवादाला कायमची तिलांजली देऊन शिस्तबद्ध पक्षाची उभारणी करणार आहेत की नाही हा खरा प्रश्न आहे. उत्तर प्रदेश व बिहारमधील घटना पाहिल्या की या दोन्ही राज्यांत जनता पक्ष प्रत्यक्ष फुटला नसला तरी फुटण्याच्या सीमेपर्यंत गेलेला आहे असे स्पष्ट दिसून येते.

चरणसिंगांनी केंद्रीय मंत्रिमंडळात पुन्हा प्रवेश केल्याने पक्षातील भांडणे मिटतील आणि सर्व घटक सहकार्याने काम करू लागतील, ही आशा अल्पजीवी ठरली आहे. उत्तर प्रदेशात संघर्षाची तीव्रता अधिक वाढेल असे काही करू नका, असा सल्ला जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी मुख्यमंत्री राम नरेश यादव यांना दिला असतानाही त्यांनी तो मानला नाही आणि पंधरा फेब्रुवारीच्या पक्षबैठकीपर्यंत न थांबता तेरा मंत्र्यांचे राजिनामे मागितले व त्यांनी ते देण्याचे नाकारल्याने त्यांना बडतर्फ करण्याची शिफारस राज्यपालांकडे केली. पक्षाच्या केंद्रीय संसदीय मंडळाने वास्तविक यापूर्वीच खंबीर भूमिका घेऊन मुख्यमंत्री राम नरेश यादव यांचा राजीनामा मागायला हवा होता आणि नवा नेता निवडण्यासाठी राज्य विधिमंडळ पक्षाची बैठक बोलवायला हवी होती. या पेचप्रसंगाला काय वळण मिळते, जनता पक्ष यातून फुटेल काय ? की आयत्या वेळी पुन्हा काही तरी तात्पुरता समझोता करून फूट टाळली जाते याचा निर्णय या आठवड्यात लागलेलाच असेल. त्यासंबंधी अधिक सविस्तर विवेचन पुढील अंकातील लेखात. □

संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# दिवसेंदिवस हरवत असलेले आकाश !

चतुर्थी करणाऱ्या लोकांबद्दल मला नितांत आदर आहे. त्यांच्याबद्दल माझे एकच गाऱ्हाणे आहे. चतुर्थी सोडताना ते पंचांगात किंवा वर्तमानपत्रात चंद्रोदय पाहून सोडतात. त्यांनी चंद्रोदय आकाशात पहायला हवा. निसर्गाशी नाते रहावे म्हणून हा उपवास आपल्या पूर्वजांनी ठेवला असावा. त्यांना पंचांगे, वर्तमानपत्रे, घड्याळे घरोघर होतील ही कल्पना नव्हती.

शहरातील लोकांना पंचांगे, वर्तमानपत्रे, घड्याळे मिळाली; पण ते आकाश हरवून बसले. समोरची पाच मजली इमारत चंद्राला अडवीत उभी असते. काही दिवसांनी मुंबई-पुण्याच्या मुलांना खेडेगावात नेऊन आकाश म्हणजे काय हे दाखवावे लागेल.

ही परिस्थिती आधीच चांगली नाही. त्यात आमच्या लेखकांचे नास्तिक साहित्य भर घालीत असते. मराठी साहित्यातला हा उणेपणा एके दिवशी एकदम माझ्या लक्षात आला. मराठी कादंबऱ्या-कथा यांतील पात्रे फार नास्तिक दाखवलेली असतात. ही नास्तिक पात्रे ते कुठून आणतात ते मला कळत नाही. आम्ही जे स्त्री-पुरुष भोवताली पहातो ते एकादशा करतात, गुरुवार-शनिवार करतात, चतुर्थ्या पाळतात, नवस बोलतात, माळ घेतात, गंडेदोरे बांधतात, वेगवेगळे खडे घालतात, कुलदैवतांचे उत्सव करतात, राशिभविष्ये पहातात, ज्योतिषी लोकांना पत्रिका दाखवतात; पण आमच्या लेखकांच्या कथा–कादंबऱ्यांतील पात्रे यांपैकी काही करताना दिसत नाहीत. ती पैशासाठी, प्रेमासाठी, मनाचे लाड पुरे करण्यासाठी तडफडतील, दुःखी-कष्टी होतील, आनंद करतील; पण कधी कुणी शनिमहात्म्य वाचेल किंवा 'आज आपल्याला उपवास आहे' म्हणेल तर शपथ.

त्यामुळेच मराठी वाङ्मय हृद्य होत नाही असे मला वाटते. नायक राशिभविष्य पहातोय असे त्यांनी घातले तर कित्येक किंवा सर्व वाचकांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळेल. वाचकांना कोणताही आनंद मिळवू द्यावयाचा नाही ही नवलेखकांची प्रतिज्ञा असेल किंवा आपल्या नायकाने राशिभविष्य पहावे हे त्यांना शरमेचे वाटत असेल. अगदी मागच्या पिढीत माणूस थोडेसे इंग्रजी शिकला किंवा त्याने कोट पाटलोण घातली की तो सुधारक समजला जाई. तो स्वतःही देव मानेनासा होई किंवा त्याला ख्रिश्चन धर्म आवडू लागे. तसेच आपण लेखक झालो म्हणजे पुरोगामी हवे आणि आपली पात्रेही नास्तिक हवीत असा लेखकांत संकेत झाल्यासारखा वाटतो. नव्या लेखकांनी तरी आता असे करू नये. लोकांच्या श्रद्धांना अनुल्लेखाने मारू नये. म्हणून नव्याने लिहिणाऱ्या लेखकांसाठी मी एक नमुना पुढे ठेवीत आहे. हा एका कथेचा आरंभ आहे.

'शशी आज घाईत होता. त्याने वीणेला नऊ वाजता संगम उपहारगृहाशी बोलावले होते. तिचे वडील तिच्यासाठी ठिकाणे पहात आहेत हे त्याला निश्चित कळले होते व त्यासंबंधी विचारून तो तिला पिळणार होता. आज आपली भरपूर करमणूक होणार, वीणा रडेलसुद्धा ही त्याची खात्री होती. फार तर नंतर तिला पिक्चर दाखववावा लागेल.

यासाठीच आज घाई. यासाठीच तो अगदी पहाटे उठला. गुरुचरित्राचा एक अध्याय रोज वाचण्याचा त्याचा नेम होता आणि संध्याकाळी मोदी गणपतीला जाऊन यावयाचं. या दोन नित्यनेमांमधला वेळच त्याला मोकळा होता.'

गोष्टीची ही सुरुवात किती नैसर्गिक वाटते पाहा. पुन्हा काही खोटे किंवा काल्पनिकही सांगितलेले नाही. जर कुणाला खोटे वाटत असेल तर त्याने पुण्यातील देवळे हिंडून पहावीत. आज मुले–मुली जीनच्या किंवा बेलबॉटम वगैरे पँटा घालतात, गुरू वगैरे कुडती किंवा टॉप्स घालतात. त्यावरून ती नास्तिक आहेत अशी उगाच गैरसमजूत करून घेऊ नका. काही वर्षांपूर्वी एका सहसंपादकाला मी 'मुले–मुली आणि देवळे' हा विषय सुचविला. देवळे हिंडून आल्यावर त्याने मला जे सांगितले तेव्हा मीच चकित झालो. आजचे कॉलजचे विद्यार्थी अत्यंत श्रद्धाळू आहेत हा त्याचा निष्कर्ष होता.

परवा गणेशजयंतीला पुण्यातील सारसबागेतील गणपतीच्या देवळात आम्ही गेलो तेव्हा त्या उत्सवासाठी आलेल्यात अगदी तरुण मंडळी पाहूनही त्यामुळेच आम्ही चकित झालो नाही. आम्ही गेलो तेव्हा कीर्तन चालू होते. कीर्तनानंतर रात्री जितेंद्र अभिषेकी यांचे गायन होते.

माझ्या डोळ्यांसमोर सारसबागेतला हा गणपती 'वाढल्या'मुळे या देवळाविषयी मला विशेष आस्था आहे. तीस वर्षांपूर्वी मी पुण्यात आलो तेव्हा झाडीने भरलेल्या टेकाडावरच्या देवळात जाणे म्हणजे लहानसे धाडस वाटे. तळ्यात उतरून जावयाचे म्हणजे पायवाट खडबडीत होती. वर चढावयाच्या पायऱ्या ओबडधोबड आणि अधेमधे काटेरी झुडुपे असा देखावा होता. काळोख पडू लागला असेल तर 'तिकडे नको' म्हणून आम्ही मागे फिरत असू. पेशवे–पार्कच्या रस्त्यावरून जाताना, तिथे देवळात दर्शनाला गेलेल्यांनी वाजवलेल्या घंटेचा गंभीर ध्वनी ऐकू येई. देवळाच्या झाडीमधून कावळे, चिमण्या, पोपट, घारी असे पक्षी वर उडताना आणि फेऱ्या घालताना दिसत. त्यांचा कलकल स्वर घंटेच्या आवाजावर ऐकू येई.

शहरातल्या वातावरणात दिवस गेल्यावर हे वातावरण आल्हाददायक होते. का कुणास ठाऊक, हळूहळू या देवळाकडची गर्दी वाढू लागली. शांत वातावरणासाठी जे इथे येत ते 'गडबड वाढली' म्हणून कुरकुरू लागले. देवळाभोवतालच्या तळ्यात बाग होण्यापूर्वीच देवळात डोहाळजेवणे होऊ लागली. स्त्रियांचा पाठिंबा मिळाल्यावर आणखी काय हवे ?

मग तळ्यात उद्यान झाले. आता देवळातली गर्दी आणखीन वाढू लागली. सकाळ-'संध्याकाळ'च्या आरत्यांना गर्दी होऊ लागली. चतुर्थी जोरात होऊ लागल्या. एवढे यश विश्वस्तांना अपेक्षितही नसेल ! त्यांनाही

उत्साह आला. पूर्वी देवाचा वार्षिक लिलाव होत असे असे कानावर होते. देवस्थान कमिटीने पुढे सर्व व्यवस्था आपल्याकडे घेतली. काही वर्षांपूर्वी त्यांनी देऊळही नवे बांधून देखणे केले आहे. बाहेरगावच्या लोकांनी पुण्यात आल्यावर 'पहावयाचेच' अशा स्थळांपैकी हे देऊळ व त्याच्या भोवतालची बाग आहे. मूळच्या तळयाच्या तळात ही बाग केली आहे. मूळचे तळे विस्तृत, आता खपच विस्तृत वाटते. नागरिकांना धावण्याचा व्यायाम करता येतो.

देऊळ तीन पाख्यात बांधले आहे. पुढच्या पाख्यात सभामंडप आहे, मूळ गाभारा सोडला तर कुठेही भिंत घातली नसल्यामुळे आणि खांब उंच घेतल्यामळे मोकळेपणा वाढला आहे. गाभाऱ्याच्या भिंतींना तिन्ही बाजूंस मोठ्या खिडक्या आहेत त्यामुळे कुठूनही देवदर्शन करता येते. सभामंडपांतील कमानींवर संगमरवरी फरश्यांवर क्रमाने गणपत्यथर्वशीर्ष कोरले आहे. गणपतीला प्रिय असलेल्या तांबड्या रंगाच्या कुरुंदी दगडात कमानींचे बांधकाम आहे.

देवाला नमस्कार करण्याबाबत माझा हात जरा जडच आहे. आमच्या पिढीतील देव न मानणारा, माणसाच्या कर्तृत्वावर भर देणारा जो एक अल्पसंख्य गट होता त्यातला मी एक होतो; पण इतके असूनही मला देऊळ ही वास्तू आवडावयाची. तिथे मनाला शांत व निश्चित वाटते-कुठलेही दडपण राहत नाही. देवळांप्रमाणे मला कीर्तनेही आवडतात. कीर्तनातली विशिष्ट तालसुरात म्हटलेली मोरोपंती आर्या अजूनही माझे पाय खिळून टाकते.

सारसबागेतील गणपतीच्या देवळात त्या दिवशी कीर्तन चालू होते. ते 'थोडा वेळ ऐकू' म्हणून आम्ही अगदी संपेपर्यंत उभे राहिलो. कीर्तनकार औरंगाबादकरबुवा होते. पन्नाशीतले हे कीर्तनकार, सतेज, गोल चेहऱ्याचे आणि डोळे हसरे होते. फिकट भगव्या अंगरख्यावर नीट चोपून बांधलेला तसाच फिकट भगवा फेटा. आर्या किंवा श्लोक-अभंग म्हणताना फेक चांगली होती. बरेच वर्षांनी मी कीर्तन ऐकत होतो. निरूपण ऐकता ऐकता मला मागची कीर्तने आठवू लागली. आत्ताच्या बुवांना प्रवासखर्चही द्यावा लागत असेल तर पूर्वीच्या बुवांना आणण्यास त्यांच्या गावी बैलगाडी पाठविली जाई. ते कीर्तन ऐकता ऐकता आम्ही मुले जाजमावरच झोपत असू. त्या दिवसापासूनची कीर्तने आठवली. त्या वेळेपासून आजपर्यंत कीर्तन तीन अवस्थातून गेले. पहिली कीर्तने अध्यात्मिक असत. भक्ती, ईश्वरप्राप्ती, मोक्ष हे त्यांचे विषय असत. त्यानंतर राष्ट्रीय कीर्तने आली. त्यांत थोर राष्ट्रपुरुषांची चरित्रे, राष्ट्रोद्धार, पारतंत्र्याची चीड वगैरे विषयांबरोबर समाजसुधारकांवर ताशेरे असत. मला एक गोष्ट कधी कळली नाही की पुराणिक-प्रवचनकार-कीर्तनकार, ज्योतिषी, संस्कृतचे पंडित यांनी विचारात प्रतिगामी का असावे ?

आता स्वातंत्र्य मिळाल्यावर काळा बाजार, लाच वगैरेवर प्रवचने, निरूपणे सुरू झाली. या स्थित्यंतरांकडे पहाता असे दिसते की राष्ट्रीय कीर्तने काही काळ गाजली तरी कीर्तनांचा दर्जा उतरतच गेला. अध्यात्मिक कीर्तनांची सर कशालाच आली नाही. याचे कारण अध्यात्मिक कीर्तनांच्या पाठीशी ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मोरोपंत, वामन पंडित, रघुनाथ पंडित यांसारख्या प्रतिभावान संतांची आणि कवींची कविता होती. नंतरच्या राष्ट्रीय कीर्तनातून गायली जाणारी काव्ये तेव्हा काही गाजली तरी ज्ञानेश्वरादी कवींची विलक्षण प्रतिभा त्यात नव्हती. आता कीर्तनात म्हटली जाणारी काव्ये त्या काव्याच्या रेकॉर्ड्सवरून त्याच धाटणीवर म्हटली जात असल्याने, ती काव्ये परिणामकारक होत नाहीत. फार तर त्या त्या रेकॉर्ड्सची आठवण करून देतात.

समोर चाललेले कीर्तन ऐकत असताना माझी खात्री झाली की, कीर्तनाचा विषय अध्यात्म हाच हवा. कीर्तनात संत आणि पंडित कवींची कविताच गाइली जावी. जर कुणाला राष्ट्राचा किंवा समाजाचा उद्धार करावयाचा असेल तर त्यांनी आपापले माध्यम शोधावे.

कीर्तनांना कमी गर्दी होत चालली आहे हे इथेही कळत होते. दर्शनाला येणारी मंडळी व कीर्तनाची मंडळी मोजली तर दर्शनांकडे फार लोकांचे चित्त असते हे लक्षात येईल. आता लोक देवदर्शनास पूर्वी जात होते-आताही जात आहेत-का? हा नेहमीचा प्रश्न आहे. तरी आधी देवळात किती लोक दर्शनाला जातात हे मोजले पाहिजे. काही लोक रस्त्यावरूनच दर्शन करतात, ते मोजले पाहिजे. ही मंडळी देवाजवळ काय मागतात? सगळेच अडचणीत असतात का ? सगळ्यांच्याच महत्त्वाकांक्षा अपुऱ्या असतात का ? एवढे खरे की, पुण्यातील देवळांतून संध्याकाळी गेलात तर माणसाला देवांचा किती आधार हवा आहे ते कळते आणि सर्व देवांत गणपतीवर भक्तांचा जेवढा भार पडतो तेवढा कुणावर नसेल. कार्याला आरंभ केल्यापासून, तडीस नेणारा गजानन आहे येथपर्यंत बहुतेकजण त्याच्यावर भार टाकतात. तो परीक्षा पास करणारा, लॉटरी मिळवून देणारा, नोकरीला लावणारा, आजार घालविणारा, पाप धुऊन काढणारा देव आहे. त्यामुळेच हल्ली 'पत्रपुष्पं, फलं, तोयं' पूजेपेक्षा दर्शनपूजाच वाढली आहे.

देवाची भक्तीही तारतम्याने करावी लागते. नाही तर काही वेळा फार चमत्कारिक गोष्टी होतात. आमच्या शेजारच्या एका छोट्या पारावरच्या देवळात गजातून कुणी तरी शंभराची नोट सारलेली मिळाली. ती कुणी टाकली याविषयी तर्कवितर्क सुरू झाले. अर्थात ती कुणी टाकली याचा पत्ता लागला नाही. गरीब गुरवाला शंभर रुपये मिळाले हे बरे झाले. तरी ज्याने ती नोट वाहिली त्याचे व्यवहार सरळ नसणार हे बहुतेकांचे मत झाले. तो माणूस आजारीपणात किंवा एखाद्या खटल्यात नवसही बोलला असेल. एकूण देवाचे जास्त केले तरी लोकांना संशय येतो.

देव ही अध्याहृत कल्पना आहे. त्या एका अध्याहृत कल्पनेवर माणूस किती विचार करतो, किती विव्हळ होतो, किती वेळ देतो, किती पैसा खर्च करतो हा एक चमत्कारच म्हणायला हवा. माणूस व्यवहारी प्राणी आहे हे म्हणणे त्यामुळेच पटत नाही. देवाचे त्याच्या मनात सारखे येते याची दोन कारणे दिसतात. एक तर त्याला आपला भविष्यकाळ कळत नाही आणि दुसरे कारण मरणाची भीती. माणसाच्या हाती नसलेल्या या दोन गोष्टी आहेत या दोन गोष्टींमुळे तो जे जे करील ते ते वाया ठरते. काही अर्थच उरत नाही यांना म्हणूनच संतांनी परमेश्वराकडे जाण्याचा भक्तिमार्ग काढला. परमेश्वराचे नाव सतत मुखात ठेवणे हाच एक मार्ग माणसाला राहिला आहे. कधी हा मार्ग चांगला वाटतो तर कधी त्याचे हसू येते. ही भक्ती वगैरे फोल ठरली तर ?

जेव्हा कुणी सांगते की, गणपतीच्या दर्शनाने माझे मन शांत झाले किंवा गणपत्यथर्वशीर्ष म्हटल्याने संकट निवारण झाले तर त्याच्यापुरते ते खरे मानावे. देव ही माणसाची आशा व अगतिकता दोन्ही आहे.

तरीही गणपतीच्या देवळात जाणे मला आवडते. इतर गणपती आहेत व इतर देवांचीही देवळे आहेत. शेवटी माणसांप्रमाणेच देवळांचेही भाग्य असते. काहींना लोकप्रियता लाभते, काहींना लाभत नाही. गणपतीला खूप भक्त आहेत ही उत्तम गोष्ट आहे. फक्त मी आधी म्हटल्याप्रमाणे या भक्तांनी पंचांगात पाहून चतुर्थी सोडू नये. प्रत्यक्ष उगवता चंद्र पहावा. त्या निमित्ताने कुणाला दिवसेंदिवस हरवत असलेले आकाश सापडले तर बरेच. ☐

परराष्ट्रीय घडामोडी । चंद्रशेखर पुरंदरे

# भुट्टोंना फाशी देणे आवश्यक !

६ फेब्रुवारीला पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाने चार विरुद्ध तीन मतांनी जनाब भुट्टोंना फाशीची शिक्षा दिली. सराईत गुन्हेगारही कुठे तरी फट ठेवतोच, या संकेतानुसार हाही माजी पंतप्रधान खुनाच्या कटाच्या आरोपात अडकला किंवा काहींच्या मते अडकवला गेला. भुट्टोंच्या एकूण राजकीय प्रवासाचा ज्याने अभ्यास केला आहे त्याला मात्र याचे फारसे आश्चर्य वाटणार नाही. खुनाच्या कटाचा गुन्हा निमित्तमात्र आहे. तो नाही तर दुसऱ्या कशात तरी हा खराब नियत असलेला माणूस अडकलाच असता ! प्रस्तुत लेखात नेहमीप्रमाणे केवळ वस्तुनिष्ठ आढावा न घेता या प्रश्नाचे व्यक्तिनिष्ठ पृथक्करण करण्याचा माझा विचार आहे. कारण हा विषय आपल्या देशाशीही संबंधित आहे.

राष्ट्रीय दर्जाच्या व्यक्ती वादातीत असतील ही बाळबोध अपेक्षा आहे; पण त्यांना केवळ नग्न सत्तापिपासेपायी कोणत्या थराला जाऊ देणे राष्ट्राला परवडेल याचा विचार करून त्यांच्या हुकूमशाही प्रवृत्तींना आळा घालणे आवश्यक आहे. जागतिक पटावर आज या प्रवृत्तीचे राष्ट्रप्रमुख पुष्कळ आढळतात. अगदी फिलिपाइन्सच्या मार्कोसपासून इराणच्या शहापर्यंत ( किंवा निक्सन–इंदिरा गांधींपर्यंत ). भुट्टो याच माळेतले अखेरचे रत्न आहे आणि जे पेरले आहे त्याची फळे 'याचि देही याचि डोळा' त्यांना भोगावी लागणार आहेत हे पाकिस्तानचे भाग्य आहे.

जगातील बहुतेक सगळ्या वृत्तपत्रांनी आणि काही राष्ट्रप्रमुखांनी या शिक्षेची अंमलबजावणी होऊ नये अशी विनंती पाकिस्तानचे सर्वेसर्वा जनरल झिया उल् हक यांना केलेली आहे. यामध्ये कायद्याहून भुट्टोवरचे प्रेम हे गृहीत आहे आणि भुट्टोंच्या पंतप्रधान असण्याच्या गोष्टीशी खटल्याची उगीचच सांगड घातलेली आहे. जर अशी सांगड घालायचीच असेल तर उलट शिक्षा अधिक जबरदस्त असायला हवी ! उच्चासनावर तुम्हाला बसवलं आहे ते खून करण्यासाठी नक्कीच नव्हे, ही समज एकदा नग्न हुकूमशहांना, त्यांना समजेल अशाच भाषेत देणे आवश्यक आहे आणि भुट्टोंच्या निमित्ताने तीच वेळ आलेली आहे.

या खटल्याबाबत ब्रिटनच्या, फ्रान्सच्या अॅटर्नी जनरल्सनी शंका व्यक्त केली आहे. ब्रिटनला पाकिस्तानचा असलेला पुळका स्वातंत्र्यपूर्व काळापासून सर्वांना माहीत आहे. फ्रान्सशी असणारा शस्त्रास्त्रांचा करार केराच्या टोपलीत जाईल काय ही भीती त्यांच्या मनात आहे. अमेरिकेने थोडासा ओरडाआरडा करण्यामागे सरळ रशियाला रोखण्याचा प्रयत्न हे कारण आहे. पाकिस्तानच्या उत्तरेला असणारा अफगाणिस्तान रशियाने घशात घातला आहेच. पश्चिमेचा इराण विकल होऊन रशियाच्या अंमलाखाली गेला नसला तरी अमेरिकेच्या हातातून सुटल्यातच जमा आहे. भारताच्या सीमेवरचा महत्त्वाचा देश म्हणून पाकिस्तान रशियाखाली जाऊ नये ही अमेरिकन विस्तारवादाची जुनी स्वप्ने आहेत. आज कार्टर असले तरी पेंटॅगॉनच्या धोरणात फरक क्वचितच पडतो. जनरल झिया उल् हक या कमी कुवतीच्या आन्तरराष्ट्रीय क्षेत्रात अपरिचित माणसापेक्षा भुट्टो अधिक सोयीचे म्हणून अमेरिकेला वेदना होत आहेत. पौर्वात्य राष्ट्रांच्या अन्तर्गत घडामोडीत नाक खुपसण्याची एक वृत्ती पश्चिमेच्या राष्ट्रात आहे. पैशाच्या माजातून ही वृत्ती जन्माला आलेली आहे. त्यातूनच या राष्ट्रांच्या अन्तर्गत कारभारात ढवळाढवळ केली जाते. जगातल्या शहाणपणाच्या कल्पित ठेकेदारांची ही अहंमन्यता अनावश्यक ठिकाणीही त्यांना बोलायला भाग पाडते, तोच प्रकार येथे घडत आहे त्या दृष्टीने मोरारजी देसाई आणि वाजपेयींनी प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे नाकारले हे योग्यच झाले.

ब्रिटन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स या देशांना आपले हितसंबंध राखणारा माणूस या दृष्टीने भुट्टोंची जरुरी आहे. त्यासाठी त्यांना भुट्टोंचे प्रेम आहे. भुट्टो स्वतः देशद्रोह कितीही करो, त्याच्याशी त्यांना कर्तव्य नाही. हा प्रकार थोडासा रशियाने कृष्ण मेननवर किंवा कुमारमंगलम् यांच्यावर प्रेम करण्यासारखा आहे. त्यामुळे या राष्ट्रांच्या नक्राश्रूंकडे लक्ष देण्याचे कारण नाही आणि मुळातच ज्यां मानवतेची काळजी एकदम तीव्रतेने सगळ्यांना वाटू लागली आहे तो अगदीच गैरलागू मुद्दा आहे आणि मानवता असलीच तर मेलेल्या मोहम्मद कासुरीच्या बापाच्या खुनाचे काय ? का तो छोटा माणूस म्हणून दुर्लक्ष करणे सोयीचे ? तेव्हा जागतिक आवाहने ढोंगी आहेत.

भुट्टो स्वत. भेकड माणूस आहे. हायकोर्टाने जेव्हा फाशीची शिक्षा दिली तेव्हा त्यांच्या एकूण वर्तनाचा अंदाज असणाऱ्यांना भुट्टो सुप्रीम कोर्टातही जिवाची भीक मागायला जाणारच याची खात्री होती. आधी भुट्टोंनी न्यायसंस्था संपली वगैरे कांगावा केला; पण लादलेले हौतात्म्य पेलण्याचीही ताकद नसल्याने परत सुप्रीम कोर्टात धाव घेतली. इतकेच नव्हे तर आताही मुलाला लिहिलेल्या पत्रात परदेशी वृत्तपत्रांनी त्यांचे कर्तव्य बजावावे अशी मागणी त्यांनी केली आहे. भेकड माणूस सूड घ्यायला तेवढाच उत्सुक असतो. मी केले ते आणि फक्त तेच बरोबर हे घड्याळाचे काटे उलटे फिरवूनही लोकांच्या माथी मारण्यासाठीहो तो उत्सुक असतो. भुट्टो जर जिवंत सुटले तर ते झियाउल् हक आणि त्यांच्या दोस्तांना जिवंत सोडतील हे अशक्यच आहे.

भुट्टोंची फाशी हा मध्यवर्ती प्रश्न आहे; पण पाकिस्तानला यात नवीन काही नाही. ८० % अशिक्षित आणि दुष्काळाचे तडाखे खाल्लेले हे राष्ट्र बांगला देशाचा तुकडा फुटून गेल्यावर कधी सावरलेच नाही. भुट्टोंनी चीनशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला; पण काराकोरमच्या हायवेवरून चीन स्वतः मदतीला येईल ही शक्यता नाही. कारण तसा तो आजवर आलेला नाही. एकूण पाकिस्तानचा इतिहास पाहिला तरी भुट्टो आजवरच्या राज्यकर्त्यांच्या मालिकेतच आहेत असे लक्षात येईल. लियाकतअली

खानचा खून झाला, गुलाम मोहम्मद राजीनामा देऊन पळाला, इस्कंदर मिर्झा देशाबाहेरच गेला. त्याच्यानंतरच्या आयुब खानाला काही दिवस नजरकैदेत ठेवून स्वित्झर्लंडला हाकलले; तिथे ते मेले आणि याह्याचा बांगलाच्या पराजयानंतर बळी गेला. आता या मालिकेतले हे चिरंजीव. धर्माच्या मध्ययुगीन कल्पनेवर उभारलेले राष्ट्र द्वेषाच्या खत–पाण्यावर किती मोठे होणार ?

Gavin young या Observer च्या वार्ताहराला दिलेल्या मुलाखतीत झियाने म्हटले आहे की, भुट्टोला जेव्हा ते अटकेची कल्पना द्यायला गेले, तेव्हा भुट्टोंनी त्यांना एक तोडगा सांगितला. तो असा, ‘ We'll have new elections. If the opposition wins, you'll impose martial law. Then with my brains & your power, we will rule Pakistan.’ या दर्जाची भुट्टोंची देशभक्ती ! वाटेल ती किंमत देऊनही माझी खुर्ची राहिलीच पाहिजे ही प्रवृत्ती आपल्या ओळखीची आहे. फक्त जशास तसे हा न्याय त्यांना आवडत नाही. कृतघ्नता आणि सत्तालोभ हे मूलस्वभाव असणाऱ्यांना देहान्तशासन देणाऱ्या रामशास्त्र्यांना नावाजण्याचे अन्यथा काहीच कारण नाही.

एकदा राजकारण म्हटल्यावर त्याचे खेळ तरी तुम्हाला मान्य पाहिजेत, नाही तर तुमचे वर्तन तरी संशयातीत असले पाहिजे. यातील काहीच मान्य नाही आणि तरीही Heads I win, tails you lose ह्या प्रवृत्तीचे चोचले कोण पुरवणार ? आणि किती काळ पुरवणार ?

पाकिस्तान फुटण्याची जबरदस्त शक्यता आता निर्माण झालेली आहे. ही शक्यताही भुट्टोंच्या फाशीशी जोडण्याचे काही कारण नाही. सिंध आणि पंजाब या दोन प्रांतांनी बहुतेक काळ पाकिस्तानवर ( बांगलाच्या निर्मितीच्या आधीपासून) राज्य केल्याने नॉर्थ-वेस्ट फ्रांटियर प्रॉव्हिन्स आणि बलुचिस्तान हे अस्वस्थ आहेतच. बांगला देश फुटण्याचे मूळ कारणही पाकिस्तानी राजकारणातले पंजाबी वर्चस्व हेच होते. नॉर्थ-वेस्ट फ्रांटियर अफगाणिस्तानने नुकताच पाकिस्तानच्या या प्रांतांतल्या बऱ्याचशा भागावर आपला हक्क असल्याचा जुना दावा परत एकदा केला आहे. भुट्टोंनी या कटकटी कधीच मिटवल्या नाहीत. त्या त्याच्या आवाक्याबाहेरच्या गोष्टी होत्या. त्याने काय केले असेल तर फक्त संशयाचे वातावरण निर्माण केले. भारताविरुद्ध चीनचा पाठिंबा घे, रशियाला अमेरिकेविरुद्ध वापर हे उद्योग करताना पाकिस्तान उत्तरोत्तर परावलंबी आणि खिळखिळेच होत गेले. Oversmart माणसाची फालतू फजिती व्हावी तसे त्याचे शेवटी होत गेले. निवडणुकात rigging केल्याच्या आरोपावर आंदोलन सुरू झाले. त्याची जर बाजू सत्याची असती तर त्याने पार्लमेंटमधल्या अर्ध्या जागा देतो अशी लालूच विरोधी पक्षांना दाखवलीच नसती. वाटेल त्याच्याशी वाटेल ते compromise करून सत्ता टिकवणे एवढा एकच उद्योग ज्याने मनोभावे पार पाडला त्याच्याबद्दल नसते प्रेम दाखवणे ‘पयःपानं भुजंगानाम्’ आहे. अशा वेळी ‘आमची क्षमाशील संस्कृती’ वगैरे गुळगुळीत वाक्प्रचार तर माझ्या तोंडाची चवच घालवतात. असल्या नेभळट वृत्तीने आजवर आम्ही इतक्या थपडा खाल्ल्या आहेत तरी तथाकथित अध्यात्माच्या थोर वारशाच्या समजुतीने दुसऱ्यांना उपदेश करण्याची खोड काही जात नाही. मध्यंतरी मुस्लिम राष्ट्रांच्या परिषदेला पै. फक्रुद्दिन अली अहमदसाहेब भारतातर्फे गेले न् देशाची अब्रू घालवून आले. तोच प्रकार संजीव रेड्डी सध्या करत आहेत.

भुट्टो आपल्या मरणाने मरत आहे त्याला सावकाश मरू दे ! सीमेवरचे एक राष्ट्र दुबळे होत असल्यास देशाला ते फायद्याचे आहे. अशा वेळी न झेपणाऱ्या वल्गना करून मानवतेची भूमिका घेण्याची जरूर नाही.

दरम्यान एका खलनायकावर त्यालाही नको असलेले व न पेलणारे हौतात्म्य लादले जात आहे; पण हीच वेळ व्यक्तीवाचून देशाचे अडत नाही हे दाखवून देण्याचीही आहे आणि एअर चीफ मार्शल अशगर खान, खान अब्दुल वलीखान किंवा बेगम वलीखानसारखी कर्तृत्ववान माणसे असताना पाकिस्तानला त्याची उणीव पडू नये.

रशियाच्या चार राज्यकर्त्यांबाबत असे म्हणतात–Lenin showed how to run a state, Stalin showed how not to run a state, Khruschev showed anybody could run a state & Brezhnev is trying to show that a state need not be run at all.

अधिक खुलाशाची गरज नाहीच ! □

‘कलाकृतीची संदर्भमुक्तता लाभलेली समर्थ कलाकृती’

–प्रा. स. शि. भावे

**जनांचा प्रवाहो चालिला**

विनय हर्डीकर । राजहंस प्रकाशन । किंमत वीस रुपये

# गॉर्की कॉलनी

लेखक : ए. एस्. मकरेन्को

अनुवाद : मीनाक्षी कोल्हटकर

पूर्वसूत्र : सहा विद्यार्थ्यांची पहिली तुकडी कॉलनीत दाखल झाली. विद्यार्थी म्हणजे एकेक नगच होते! हुल्लडबाजी, शिरजोरी करून शिक्षकांचा जास्तीत जास्त अपमान करण्याची आणि मनोधैर्य खच्ची करण्याची प्रवृत्ती वाढतच चालली. शेवटी एक दिवस स्फोट झालाच. एका विद्यार्थ्याला आंतोनने स्वैपाकासाठी लाकूड कापून आणायला सांगितलं. त्याने नकार दिला. आंतोनने फाडदिशी त्यांच्या तोंडात मारली. त्याचे मानगूट धरून त्याला चांगलाच बुकललं. ही मात्रा लागू पडली. कॉलनीत शिस्तीचं वातावरण प्रथमच निर्माण झालं.

## प्रकरण तिसरे

## आमच्या दैनंदिन गरजा

मागच्या प्रकरणात वर्णन केलेल्या घटनेनंतर दुसऱ्या दिवशी मी सर्व मुलांना सांगितले, 'तुमची रहाण्याची जागा स्वच्छ असलीच पाहिजे. कॉलनीबाहेर जायचं असलं तर विचारूनच गेलं पाहिजे. कॉलनीबाहेर जायचं असलं व विचारून न गेल्यास त्यांनी परत कॉलनीत येण्याचे कष्ट घेऊ नयेत!'

वोल्कोवनं विचारलं, 'तुम्ही हे नियम अगदी कडक करणार का?'

'हे पहा, ते तुम्ही ठरवू शकता. मी एवढं सांगू इच्छितो की, कॉलनीत शिस्त असलीच पाहिजे! तुम्हाला जर हे पटत नसेल तर तुमचा मार्ग तुम्हाला मोकळा आहे. ज्यांना इथं रहायचं असेल त्यांनी कॉलनीची शिस्त पाळलीच पाहिजे, मग तुम्ही काहीही म्हणा; पण मला इथे रिकामटेकड्या गुंडांचा अड्डा चालवायचा नाही!'

झादारोव म्हणाला, 'बरोबर आहे. आन्तोन, मी तुमच्याशी सहमत आहे.' असं म्हणून त्यानं हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. 'वोल्कोव, तू महामूर्ख आहेस! आपल्याला इथे काहीही करून रहायचंय आणि तुरुंगापेक्षा हे शतपटीनं चांगलं आहे.'

'शाळेत पण गेलं पाहिजेच का?' वोल्कोव

'अर्थातच!'

'समजा, मला शिकण्याची आवड नसेल तर?'

'इथं शिक्षण सक्तीचं आहे. तुला आवडो अगर न आवडो. झादारोवन आता सांगितलं ना की तू महामूर्ख आहेस म्हणून. तू शिकून शहाणा हो पाहू!'

'ठीक आहे. इथं येऊन पडलोत तर खरे. सांगाल ते ऐकलंच पाहिजे!'

झादारोवबरोबर झालेल्या त्या झटापटीमुळे कॉलनीच्या शिस्तीला वेगळंच वळण लागलं. मी कबूल करतो की, मला खरोखर बैचेन वाटत होतं. मी माझ्या एका विद्यार्थ्याला मारलं, म्हणून चमत्कारिक टोचणी लागून राहिली होती; पण त्याचबरोबर प्रचलित शिक्षणतंत्राचा कमकुवतपणा व माझ्या हातून झालेलं गैरवर्तन या सगळ्यातून मी एवढं सार काढलं की, शिक्षणतंत्रातील सदसद्विवेकबुद्धी ही पुढ्यात असलेल्या तातडीच्या कामापेक्षा नक्कीच कमी महत्त्वाची आहे. मी ठरवलं की, इतर मार्ग फसल्यास शिस्त लावण्याच्या बाबतीत सत्ता हाती घेऊन हुकुमशहा व्हायचं. त्यानंतर थोड्याच दिवसांत वोल्को मॉनिटर असताना डॉरमिटरी अस्वच्छ ठेवल्याबद्दल व ती साफ करण्याचं नाकारल्याबद्दल आमच्यात झटापट झालीच. त्याच्याकडे तीक्ष्ण नजरेनं पहात मी म्हटलं,

'माझा राग ओढवून घेऊ नकोस. मुकाट्यानं आपलं काम कर!'

'समजा, मी केलं नाही. तुमचं ऐकलं नाही तर तुम्ही काय कराल? मला कानफटात माराल? तसं करायचा तुम्हाला काही अधिकार नाही.'

त्याची कॉलर धरून मी त्याला जवळ ओढलं व त्याच्या कानात ओरडून सांगितलं की, 'मी तुला एकदा समजावून सांगितलं. मी आता कानफटात मारणार नाही, तर तुला जन्मभर अद्दल घडेल असं करीन! भले तुला तुरुंगात जावं लागलं तरी चालेल.'

वोल्कोव माझ्या हातून सुटला व जराशा काकुळतीनं म्हणाला, 'एवढ्यासाठीच तुरुंगात पाठवू नका. मी खोलीची साफसफाई करीन! तुम्ही जा खड्डयात!'

'तोंड सांभाळून बोल!'

'कसं बोलायचं सांगा ना.'

'नाही. घाल शिव्या!'

त्यावर तो मोठ्यानं हसला. 'रागावू नका. मी खोली साफ करीन !'

मला मोठी शिस्त लावायचा राजमार्ग सापडलाय असं कधीच वाटलं नाही. झादारोवचा झालेला प्रकार झादारोवपेक्षा मलाच भारी पडला होता आणि प्रत्येक वेळी आपण असाच प्रयोग करणार काय अशी भीती वाटू लागली.

लिडियानं तर माझ्यावर टीकाच करायला सुरुवात केली. 'आन्तोन, तुम्ही पद्धत शोधून काढलीत; पण ती काहीशी आपल्या जुन्या वळणाचीच नाही का ? आपण सर्वांनी–मी सुद्धा खरोखरच त्यांना बडवून काढायचं का ? का तो अधिकार फक्त तुमचा एकट्याचाच ?'

यावर 'थोड्या दिवसांनी सांगेन,' असं मी जरा घुश्श्यातच उत्तर दिलं, 'मला स्वत:लाच अजून नीट समजत नाही.'

एकातेरिना मात्र जास्तच त्रासलेली दिसत होती व माझ्याशी लांबून लांबूनच बोलत होती. एके दिवशी तिने मला विचारलं,

'कसं काय वाटतंय तुम्हाला, आन्तोन ?'

'छान वाटतंय; पण का बरं ?'

'झाल्या प्रकाराचा काय परिणाम झालाय, माहीत आहे का ?'

'काय बुवा ?'

'मुलं तुमच्याबद्दल फार उत्साहानं बोलतात. इतकंच नव्हे तर ती तुमच्या प्रेमात पडली आहेत, आन्तोन. विशेषत: तुमचा झादारोव !'

'कशामुळं असावं बरं ?'

'कदाचित सदैव गुलामगिरीत राहिल्याचा तर हा परिणाम नाही ना ?' ती म्हणाली.

मी जरा विचार करून बोललो, 'तसं नव्हे हे. त्याच्याशी काही संबंध नाही; पण हे दुसरचं काही तरी आहे. जरा खोलात जाऊन विचार करू या. झादारोव तसा माझ्यापेक्षा केवढा तरी प्रचंड ! त्यानं एका दणक्यात माझी चटणी उडवली असती. ते तसे कशाला भीत नाहीत. बुरुन वगैरे सारेच अवाढव्य आहेत. या सगळ्या प्रकारात मार खाल्लेला ते विसरून गेले आहेत; पण त्यांनी लक्षात ठेवलंय ते हे की, त्यामागची माझी भावना–माणसाचा संताप. झादारोवला नक्कीच माहीत आहे की, मी त्याला हातही न लावता सरळ त्याला परत कमिशनकडे पाठवून तुरुंगात रवानगी करू शकलो असतो; पण मी तसं केलं नाही, तर दुसराच मार्ग पत्करला. तो मला धोकादायक होता; पण अरेरावीचा नसून खरा माणुसकीचा मार्ग आहे. त्यांना पण आपल्या कॉलनीत रहायची गरज आहे की नाही ? आहेच. तेव्हा गोष्टी इतक्या साध्या व सरळ नाहीत. शिवाय आपण त्यांच्यासाठी कसे रात्रंदिवस राबतो ते पण त्यांना दिसतंच आहे की !

तीहि अखेरीस माणसंच ना ?'

'आणि हेच खरं महत्त्वाचं आहे. तुम्ही म्हणता तसंही असेल.' एकातेरीना म्हणाली.

यावर आमच्याजवळ विचार करण्यात घालवायला जास्त वेळ नव्हता. एका आठवड्यानंतर एक फेब्रुवारीला मी शहरात जाऊन आणखी १५ मुले आणली. ती अगदी नमुनेदार व अक्षरश: अंगावर चिंध्या गुंडाळलेली अशी होती. त्यांना स्वच्छ कसे करायचे व कपडे कुठले द्यायचे हा मोठाच प्रश्न होता आणि अशा तऱ्हेने मार्चपर्यंत जवळजवळ ३० पोरे कॉलनीत आली. बहुतेकजण कमालीची दुर्लक्षित व खरूज वगैरेंनी भरलेली आणि अगदी जनावराच्या कोटीत नेऊन बसण्याजोगी होती. त्यांच्याकडून समाजशिक्षणाच्या लायकीची अपेक्षा करणेसुद्धा चुकीचे होते. त्यांना सुधारून त्यांच्यात माणुसकी निर्माण करण्याची किंवा क्रियाशीलपणा निर्माण होण्याची जराही आशा नव्हती.

कॉलनीत शिक्षकवर्गाचा पण सुळसुळाट वाढू लागला. मार्चपर्यंत शिक्षणतंत्रज्ञांची जणू काय एक समितीच तयार झाली ! एक इव्हान इवानोविच ऑसिपोव व त्यांची पत्नी नाताल्या मारकोवना हे आपले मोठे बिऱ्हाड घेऊन कॉलनीत आले. त्यांच्या सामानात खुर्च्या, कोच, कपाटे, बश्या, चमचे वगैरे पुष्कळ होते. आमची लक्तरे घातलेली मुले त्या सामानाकडे एखाद्या आधाशासारखी पहात होती आणि मला खात्री होती की, त्या वस्तू नुसत्या न्याहाळण्यात मुलांना रस नव्हता. त्यातल्या काही वस्तू लवकरच नाहीशा होऊन जवळच्या शहरातल्या बाजाराची वाट धरतील याबद्दल मला मुळीच शंका नव्हती !

दुसऱ्या आठवड्यात एका हाउसकीपरची नेमणूक झाली व आसीपोव कुटुंबाबद्दलचे कुतूहल जाऊन ते हाउसकीपरच्या सामानावर केंद्रित झाले. ही बाई फार साधी व सरळमार्गी होती. तिचं सामान फारसे नव्हते पण तोंडाला पाणी सोडणाऱ्या काही वस्तू तिच्याकडे होत्या. उदा. लोणची, मुरंबे, बरेचसे पीठ, काही खोकी, पेटचा, अशाच वस्तू की ज्या आमच्या मुलांच्या चाणाक्ष नजरेत बरोबर भरतील !

बाईंनी आपले सामान जिथल्यातिथे नीटपणे लावले. बाईंची व आमच्या काही कारटयांची लवकरच दोस्ती झाली. एकमेकांना मदतही होऊ लागली. पोरांनी जळण्याची लाकडे आणायची, बाईंची शेगडी पेटवायची व बदल्यात बाईंनी त्यांना कधी चहा, कधी खाऊ द्यावा आणि कधीकधी नुसताच उपदेश शिकवावा.

खरं तर आमच्या कॉलनीत हाउसकीपरला करण्यासारखे काही काही काम नव्हते. तिच्या नेमणुकीमागे काय हेतू असावा याचा तर्क मला करता येईना. आम्ही तसे गरीब होतो व हाउसकीपरची आम्हाला जरुरी नव्हती.

आमच्याकडे असलेल्या मोजक्या खोल्यांत आमच्या कर्मचाऱ्यांना रहायची सोय केली होती. मोठ्या मुष्किलीने दोन मोठ्या खोल्या कशाबशा दुरुस्त केल्या होत्या. एका खोलीत तीस खाटा व तीन टेबले ठेवली होती. तिथेच मुले जेवत व त्याच टेबलांचा अभ्यासासाठी उपयोग करीत. बाकी किती तरी जागा–एक मोठी डॉरमिटरी, जेवणघर, शाळेचे दोन वर्ग, ऑफिस वगैरे अजून दुरुस्त करायची राहिली होती. आमच्याकडे अंथरुणे–पांघरुणेही बेताचीच होती. बाकी कपड्यांची तर गोष्टच सोडा, आम्ही आपले आमच्या गरजेच्या वस्तूंसाठी व कपड्यांसाठी या ना त्या खात्याला सारखे विनवणी करीत असायचो.

पब्लिक एज्युकेशनच्या ज्या अधिकाऱ्याने ही कॉलनी काढण्याची कल्पना सुचविली व अंमलात आणविली होती त्याची बदली झाली होती. त्या जागी आलेले नवे साहेब काहीच लक्ष घालीनात. त्यांना



अनुवादिका

सौ. मीनाक्षी कोल्हटकर या नागपूर विद्यापीठाच्या बी. ए. आहेत. तसंच मॉंटेसरी डिप्लोमा व टाटा इन्स्टिटयूटचा सोशल सायन्स अँड अॅडमिनिस्ट्रेशन हा डिप्लोमा त्यांनी घेतलेला आहे. 'जुवेनाइल डिलिक्वन्सी अँड करेक्शनल अॅडमिनिस्ट्रेशन' हे या डिप्लोमामधील त्यांचे विशेष अभ्यासाचे विषय होते. १९४१ ते १९७८ या काळात नर्सरी स्कूल, इं. डि. ससून कंपनीच्या डेव्हिड मिलमध्ये समाज कल्याण खातं, चिल्ड्रन्स एड सोसायटीमध्ये प्रोबेशन ऑफिसर आणि टाटा ब्लड बँक व महाराष्ट्र स्टेट विमेन्स कौन्सिलचं रेस्क्यू होम इ. संस्थांमधून सौ. कोल्हटकर यांनी काम केलेलं आहे. या सर्वच ठिकाणी त्यांचा आर्थिक व सामाजिकदृष्टया दुर्बल समाजाच्या मुलांशी सतत संपर्क आला. साहजिकच अशा मुलांचे राहणीमान, त्यांच्या अडचणी, त्यांचा सांस्कृतिक दर्जा, त्यांच्या नीति-अनीतीच्या कल्पना, वेडगळ, भ्रामक समजुती वगैरेंची चांगली कल्पना त्यांना येऊ शकली.

या क्षेत्रात वावरत असतानाच आन्तोन मकरेन्को यांचे प्रस्तुत 'रोड टू लाइफ' हे पुस्तक व या सोव्हिएत शिक्षणशास्त्रज्ञाची इतरही अनेक पुस्तके त्यांच्या वाचनात आली. आपल्याकडील परिस्थिती वेगळी असली तरी उन्मार्गी, समाजाने टाकून दिलेल्या मुलांमधून नवा माणूस घडवण्याचे मकरेन्को यांचे प्रयोग व यासंबंधीचे त्यांचे विचारमंथन उपयुक्त व मार्गदर्शक ठरू शकेल असे वाटल्यावरून त्यांनी 'रोड टू लाइफ'चा 'गॉर्की कॉलनी' हा मराठी अनुवाद करण्याचे काम हाती घेतले व नुकतेच संपवले. आंतरराष्ट्रीय बालकवर्ष सुरू होत आहे. या वर्षातच हा अनुवाद प्रसिद्ध होण्यात विशेष औचित्य आहे. म्हणून गेल्या अंकापासून तो 'माणूस'मधून क्रमशः सुरू झालेला आहे.

पोलादी पडद्याआडच्या राजकीय घडामोडी यापूर्वी आपल्याकडे खूपच अनुवादित झालेल्या आहेत. हा एक नवाच विषय सौ. कोल्हटकर यांनी पुढे आणला आहे. यात ओघाओघाने येणारे क्रांतीनंतरच्या रशियातील सर्वसामान्य समाजदर्शन तर खूपच वास्तववादी व यापूर्वी मराठीत न आलेले असे आहे. या अनुवादाचे म्हणूनच मराठी वाचकांकडून भरपूर स्वागत होईल असा विश्वास वाटतो.

—संपादक.

दुसरीच अनेक कामे होती.

जिल्हा पब्लिक एज्युकेशन खात्यातली परिस्थिती पण आमची स्वप्ने साकार करायची संधी देईल असे वाटण्याजोगी नव्हती. लहान-मोठ्या खोल्या व त्यात रंग व पॉलिश उडालेली टेबले, ड्रेसिंग टेबले, खेळायची टेबले व त्यांच्याभोवती निरनिराळ्या आकारांच्या मोडक्या खुर्च्यांनी सारी खाती भूषविली होती. निरनिराळे फलक त्या टेबलांजवळ भिंतीवर टांगले होते. बहुतेक वेळा ह्या टेबलावर काम करणारी माणसे हजर नसायचीच! खात्याचा प्रमुख कुठला व कारकून कुठला हे समजणे कठीणच होते. तिथे सारा गोंधळच होता व कोणालाही काही माहिती मिळणे तसे मुश्किलीचेच होते. लोक बिचारे तिष्ठत बसत व मग कोणीही एखादा माणूस दिसला की, त्यालाच सर्व खात्यांची माहिती विचारीत सुटत. मुख्यतः त्यांना हवे असलेले तेच खाते आहे, का दुसरे कुठले व त्यांनी तिथेच अर्ज करायचा का व तसे नसेल तर मागच्या वेळचा माणूस कुठे गेला? इतकेही करून हवी असलेली व्यक्ती भेटलीच तर ती पुन्हा एकदम लुप्त होत असे!

आम्ही पण असेच चौकश्या करीत फिरत असू. १९२१ च्या हिवाळ्यात आमची कॉलनी काही एखाद्या शिक्षण संस्थेसारखी दिसत नसे. कपड्यांच्या बाबतीत तर आमची फारच दुर्दशा होती. आमची मुले फाटके-तुटके कपडे घालूनच असत. जेमतेम कपडे होते, असे म्हणायचे. आमची पहिली तुकडी मारे उत्तम कपडे करून आली होती; पण कॉलनीच्या सर्व तऱ्हेच्या कामात उदा. लाकडे तोडणे, स्वयंपाक करणे, साफसफाई करणे या सर्व प्रकारात ते कपडे जास्त दिवस टिकणे कठीणच. त्यामुळे कपड्यांच्या बाबतीत तेही इतरांच्या

रांगेत येऊन बसलेले होते.

मार्च महिन्यापर्यंत आमची मुले मिलर डारगोमाय झीस्कोच्या ब्रॅटर पिस्को नाटकातील पात्रांशी बरोबरी करण्याच्या अवस्थेला पोचली होती. बूट तर फारच थोडयांना होते. कित्येकजण बिचारे पायांना कापडाच्या पट्टया बांधत. तेही सुख सर्वांनाच मिळत नव्हते.

आमचे जेवण म्हणजे एक प्रकारची पातळ कांजी होती. सात्त्विक पदार्थ काहीच नसत. त्या काळी निरनिराळ्या प्रकारचे शिधावाटप असे. सर्वसाधारण प्रकारचा, वाढीव, आजाऱ्यांचा, चांगल्या सशक्त लोकांसाठी शिधा, विश्रांतीगृहाचा शिधा, हॉस्पिटलचा मंद बुद्धीच्या रोग्यांसाठी शिधा, असे प्रकार असत. आम्ही कधी लाचारी दाखवून, कधी भांडून, कधी डावपेच लढवून, कधी अन्न टंचाईमुळे मुलांच्यात भांडणे लागतील अशी ओरड करून काही खास वस्तू मिळविण्याची खटपट करीत असू. त्या काही फारशा नसत. चरबी, रोटी, पाव वगैरेचा त्यात समावेश असे; पण आम्हाला ते मिळत नसे. आम्हाला फार तर थोडी जास्त भाकरी मिळत असे. प्रत्येक वेळी नवे डावपेच लढवून हे सारे मिळवावे लागे. तरीही कधीकधी आम्हाला मटन, मासळी व साखरेचे रेशन मिळे; परंतु बरेच वेळा ते मानसिक रोग्यांसाठी आहे व आमच्या मुलांसारख्या नैतिक दृष्टया कमजोर रोग्यांसाठी नाही असे सांगण्यात येई.

कधी कधी शिक्षणतंत्राच्या परिसराबाहेर जाऊन आम्ही जिल्हा पुरवठा खात्याकडून किंवा पहिल्या राखीव फौजेच्या अन्न किंवा इतर खात्याकडून मिळल तसा साठा घेत असू; पण शिक्षणखाते या आमच्या नियमबाह्य वर्तनाबद्दल नेहमीच नापसंती दर्शवीत असे. ह्या हालचाली आम्हाला फार गुप्तपणे कराव्या लागत.

आम्हाला नेहमीच्या साध्या व सरळ शब्दात एका कागदावर अशी विनंती लिहून द्यावी लागत असे, 'उन्मार्गी मुलांच्या कॉलनी-साठी धान्यसाठा द्या!' कॉलनीत मात्र त्या उन्मार्गी शब्दाचा आम्ही कधीही वापर केला नाही व तशा तऱ्हेचे नावही कॉलनीत दिले गेले नाही. त्या काळी आमच्या मुलांना नैतिकदृष्टया कमजोर असे म्हणत असत; पण शिक्षणखात्याच्या संबंधितांना चटकन ओळख पटायला त्याच शब्दांचा वापर करणे चांगले वाटे, त्याला काय करणार?

अशा तऱ्हेने मला वरचेवर आम्हाला लागणारी साधनसामुग्री मिळविण्यासाठी त्या संबंधित खात्याच्या दाराशी निष्ठत बसावे लागे. माणसांची सतत रीघ इथ लागलेली तसे. एकेकदा एवढी गर्दी होई की, कोणीही मध्येच घुसून जाई. एकदा आत शिरले की इतरांना हातांनी बाजूला करून तुम्हाला संबंधित अधिकाऱ्याच्या टेबलाशी पोचावें लागे व मुकाटयाने आपला कागद त्याच्या हाती द्यावा लागे.

पुरवठाखात्याला या शिक्षणक्षेत्रातल्या तपशिलाची माहिती असणे आवश्यक नव्हते. त्यामुळे पुष्कळदा उन्मार्गी मुलांचा व शिक्षण खात्याचा काय संबंध अशा प्रश्नांची सरबत्ती होई व त्यातून काहीच निष्पन्न होत नसे.

कधी कधी कागद पाहून विचार करून अधिकारी प्रश्नांची सरबत्ती करीत. कधीकधी मला सांगण्यात येई की, मी जेलखात्याकडे किंवा दुसऱ्या खात्याकडे जावे व तिथून मला लागणारे सामान मिळवावे.

मला सांगावे लागे, 'जेलखाते मला सामान देत नाही. कारण आम्ही त्या खात्यात नाही. आमची मुले अल्पवयीन आहेत.'

'मग तुम्हाला देते कोण?'

'ते अजून नक्की ठरलेले नाही.'

'हे चमत्कारिक नाही का?'

'तुम्ही म्हणता, हे ठरायचेय'

अशा वेळी तो अधिकारी कागदावर काही खरडून मला सांगे की, 'एका हप्त्याने या. मग सांगतो.'

'तोपर्यंत २० एक किलो द्या.'

'५ किलो मिळेल.' तो म्हणे.

'अहो, ५ किलोने काय भागणार?'

अशा तऱ्हेने संभाषण चाले. आमच्यासारखा निर्णय होत नसे आणि चौकशीही कधी होत नसे.

अशा तऱ्हेच्या संभाषणाचा शेवट आम्हाला पाहिजे तसा होण्यासाठी अधिकाऱ्यानं खरं तर उगाच नको ते प्रश्न उपस्थित न करता आम्ही दिलेल्या जरुरीच्या कागदावर 'आपली मान्यता आहे,' असं लिहून देणं जास्त श्रेयस्कर होतं. असं झालं की लगेच कॉलनीत येऊन कालिनाच्या हातात तो हुकूम देई व त्याला सांगे, 'ताबडतोब जाऊन ते हस्तगत करा! नाही तर चौकशी सुरू झाली की, काहीच पदरात पडणार नाही!' कालिना खूष होऊन त्या कागदाकडे बघत म्हणे, 'अरे वा! आता कुठून हे १०० किलो आले?'

'अहो, त्या जिल्हाशिक्षणखात्याच्या पुरवठाविभागाकडून जिल्हा-अधिकारक्षेत्रखात्याला मिळालंय.'

'कुठून का असेना, आपल्याला त्याच्याशी काही कर्तव्य नाही!'

माणसाची पहिली गरज म्हणजे अन्न व मग वस्त्र. त्यामुळे अन्नासाठी केली तेवढी फिकीर कपडयांसाठी आम्ही कधीच केली नाही. कारण आमची मुलं खरोखर सदैव अर्धपोटी रहात असत आणि त्यामुळे त्यांना उपाशीपोटी नीतिमत्तेचे धडे देणंही योग्य नव्हतंच. म्हणून ते आपापल्या परीनं आपलं पोट भरण्याचे मार्ग शोधून काढीत.

खाजगीरीत्या पोट भरण्यासाठी म्हणून काही मुलं आमच्या बाजूच्या तलावात मासेमारी करीत. हिवाळ्यात हे काम फार जिकिरीचे होई. आमचे शेजारी जवळच्या ओढयात व आमच्या तळयात एका विशिष्ट प्रकारची जाळी लावीत. आमच्या मुलांनी मासेमारीला जाळी कुठून आणायची? जिवंत राहाण्याचा हक्क बजावण्यासाठी त्याच वेळी क्षणिक फायद्याचा मोह आवरून आमच्या मुलांनी जाळी काढली नाही; पण एक दिवस नियम मोडणारा एक महाभाग निघालाच!

तारानेटनं कुठून तरी एके दिवशी बरीचशी जाळी कॉलनीत आणली. हा मुलगा अंगानं बारीक, तोंडावर डाग असलेला; परंतु विनोदी असून एका चाराच्या टोळीतलाच होता. त्याला सामुदायिक जीवनाची चाड नव्हती. त्या जाळी आणण्यामुळे आजूबाजूचे शेतकरी रागावले व जोरदार भांडण झालं. ती जाळी त्यांना परत करावी लागली; पण तारानेट स्वस्थ बसणारा नव्हता. कुठून तरी दुसरी जाळी त्यानं मिळविली. ती म्हणे जवळच्या शहरातल्या मित्राने दिली असं त्यानं भासवलं. त्यामुळे मासे पकडणं हा काहीजणांचा उद्योग झाला. सुरुवातीस मासे खाण्याचा मान फार थोडया जणांचा

होता. एक दिवस तारनेटनं मलाही त्या भाग्यवानात सामावायचं ठरवलं. तो एका बशीत तळलेली मासळी घेऊन आला व मला म्हणाला, 'आन्तोन, मी तुझ्यासाठी मासळी आणलीय.'

मी त्याला नको म्हणून सांगितलं.

'का नको तुम्हाला ?'

'ते बरोबर दिसत नाही. कारण सर्वांना मासळी मिळत नाही. म्हणून मी घेऊ शकत नाही.'

तारानेट जरा घुस्सावला व म्हणाला, 'सर्वांना काय म्हणून ? मी जाळी आणली. मासळी पकडायला कष्ट केले आणि बाकीच्यांना काय म्हणून मी त्यातला भाग द्यायचा ?'

'म्हणूनच तू तुझी मासळी घेऊन जा. कारण मी ती जाळी आणली नाहीत आणि मासळी पकडायला कष्ट पण केले नाहीत.' मी त्याला सांगितलं.

'ही भेट आहे.' तो म्हणाला.

'तरीही मी घेणार नाही. मला हे पसंत नाही. हा सारा प्रकारच साफ चुकीचा आहे.'

'त्यात काय चुकलं ?' त्यानं विचारलं.

त्यावर मी म्हटलं. 'सारं सांगतो तुला. तू म्हणतोस की जाळी विकत आणली नाहीस, तर ती तुला दिली कोणी ? ते असो. तुझं म्हणणं, ती फक्त तुझ्या उपयोगासाठी दिली, खरं ना ?'

'अर्थातच.

'ठीक आहे; पण मला वाटतं की, ती सर्वांसाठी आहेत.'

'सगळ्या कॉलनीसाठी असं कसं तुम्ही म्हणता ?'

'तू मासळी पकडलीस. तळायला विस्तव, कढई हे सारं कुठलं ? मग मी तर तुझी जाळी काढून घ्यायला हवीत; पण मी तसं केलं नाही. तुला आपल्या बरोबरच्यांची आठवण झाली नाही. त्याचं मला वाईट वाटतं, बरं का !'

यावर तो म्हणाला, 'तुमचं म्हणणं बरोबर आहे आणि आता इथून पुढे मासळी सर्वांना मिळेल. आता तरी तुम्ही घ्याल ?'

मग मी पण त्या मासळीचा स्वीकार केला. त्या दिवसापासून सर्व मासळी सरळ स्वयंपाकघराकडे जाऊ लागली. सर्वांना ती मिळू लागली.

खायचे पदार्थ आणखी मिळविण्याचा आमच्या मुलांचा दुसरा मार्ग म्हणजे दररोज बाजारात जायचं. कालिना दररोज काही तरी आणण्यासाठी शहरात जाई. त्याच्याबरोबर शहरात काही बरी निमित्त काढून जायचं. काही मुलांना डॉक्टरकडे उपचारासाठी जावयाचं असे, तर काहींना कुठल्या तरी कमिशनसमोर हजर व्हायचं असे. ही मुलं कालिनाला बरोबर नेण्याचा आग्रह धरीत. बाजारातील निरनिराळ्या दुकानांवर हल्ला करून पोट भरून घेत. येताना आपले खिसे भरून आणायचे व आपल्या मित्रांना द्यावयाचे. कुणी सांगत, मित्रांनी दिले. कोणी सांगत, नातेवाइकांनी दिले. मी त्यावर आक्षेप घेत नसे. कारण बिचारी अर्धपोटी असत. त्यांना काय नैतिक पाठ देणार ?

मुलंच काय पण आम्ही सारी शिक्षकमंडळी व चालकमंडळी पण तशीच होतो. आमचे तुटपुंजे पगार. त्यातून काहीही खरीदता येत नसे. माझ्या स्वतःच्या बुटाची टाच पार झिजून गेली होती. मी पण कापडाचे तुकडे गुंडाळीत असे. आम्ही तसेच शहरात वगैरे जायचो. याला अपवाद होती फक्त एकातेरीना. ती मात्र नेहमी अगदी व्यवस्थित व स्वच्छ कपड्यात असे. ◻

---

### प्रकरण चवथे

## कॉलनीतील अंतर्गत व्यवस्था

---

फेब्रुवारी महिन्यात एक दिवस माझ्या खणातून नोटांचं एक बंडल— जवळजवळ माझ्या सहा महिन्यांच्या पगाराइतकी रक्कम चोरीला गेलेली आढळून आली !

त्या वेळी माझ्या ऑफिसचा उपयोग ऑफीस, शिक्षकांची खोली, जमाखर्च ठेवायची जागा या साऱ्या कामांसाठी होत असे कारण मी स्वतःच ती सारी कामं उरकीत असे. नोटांचं बंडल माझ्या खणातून कुलपाला धक्का न लावता नाहीसं झालेलं आढळलं.

त्याच दिवशी संध्याकाळी मी मुलांना एकत्र जमवून चोरीची हकीगत सांगितली. मी म्हटलं,

'चोरी कशी झाली हे मी सिद्ध करू शकत नाही. त्यामुळं माझ्यावरच आळ येण्याचा संभव आहे.'

मुलांनी ते शांतपणे ऐकून घेतले व ती निघून गेली. हे झाल्यावर दोघा मुलांनी मला अंधाऱ्या मैदानात माझ्या खोलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बाजूला नेलं. ती मुलं अनुक्रमे तारानेट व गुड अशी होती. ते म्हणाले,

'पैसे कोणी घेतले ते आम्हाला माहीत आहे; पण आम्ही सर्वांसमक्ष सांगू शकत नाही. कुठे ठेवले आहेत ते आम्हाला माहीत नाही हं ! आम्ही नाव सांगितलं तर तो पैसे घेऊन पळून जाईल !'

'कोण आहे त्याचं नाव सांगा !' मी म्हटलं.

त्यावर तारानेटनं काही सांगायचा प्रयत्न केल्याबरोबर गुडनं त्याला न सांगण्याविषयी खुणवलं. गुडला ते बरोबर वाटलं नाही असं दिसलं.

'वायफळ बोलण्यात काय अर्थ आहे ?' गुडनं म्हटलं, 'त्यानं एव्हाना वाट लावली असेल !'

'मग तू सांग पाहू, तुझीच गठडी वळेल म्हटलं !'

'बरं मला सांगा की. मी त्याच्याशी बोलेन !'

पण ते सांगायला तयार होईनात तारानेट ती गोष्ट गुप्त ठेवायला बघत होता 'जशी तुमची इच्छा !' असं म्हणून मी त्यांचा नाद सोडून दिला व खोलीत जाऊन झोपलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी गुडला त्या नोटा तबेल्यात सापडल्या. कोणी तरी खिडकीच्या गजांमध्ये त्या खोचून ठेवल्या होत्या आणि त्या तबेलाभर उडून पसरल्या होत्या. गुड आनंदानं धावत माझ्याकडे आला त्याच्या हातात त्या चुरगळलेल्या नोटा होत्या !

गुडनं ही बातमी कॉलनीभर फिरून साऱ्यांना सांगितली. सारेजण आनंदित झाले व माझ्या ऑफिसात नोटा पहाण्यासाठी धावत धावत

गोळा झाले. एकटा तारानेट तेवढा मागून मान ताठ ठेवून शिष्टासारखा आला. मी त्याला किंवा गुडला आदल्या दिवशीच्या आमच्या संभाषणाबद्दल किंवा त्यांच्या हालचालींबद्दल काहीही विचारले नाही.

दोन दिवसांनी आमच्या कोठीच्या खोलीचं कुलूप तोडून बरीचशी चरबी पळविली गेली आणि थोड्याच दिवसांनी कोठीच्या खोलीचा सबंध कुलुपांसकट खण काढून चरबीचा साठा व गोठवलेलं दही पळविलं गेलं. आणखी थोड्याच दिवसांनी कोठीच्या खोलीची खिडकीच तोडून नेली! फेब्रुवारी-क्रांतीच्या वर्षदिनाच्या उत्सवासाठी राखून ठेवलेली मिठाई पळविली. शिवाय गाडीचं वंगण पण पळवलं. गाडीचं वंगण आम्हाला सोन्यापेक्षाही किंमतीचं होतं.

कालिना बिचारे चक्रावून गेले. ते पोरांची तोंडं न्याहाळीत व पाइपचा धूर सोडून पोरांशी वादविवाद घालीत बसत. त्यांना शिव्या घालून म्हणत,

'काटर्यांनो, ते तुमच्यासाठीच होते. तुम्ही तुमचीच चोरी करता लेको!'

माझ्या कल्पनेप्रमाणे दुसऱ्या कुणापेक्षा तारानेटला याबद्दल नक्कीच माहीत होतं; पण तो बोलत नव्हता. त्याबद्दल काही बोलणं त्याला योग्य वाटत नसाव. काही मुले मनमोकळेपणाने यावर चर्चा करीत. आपल्या सामानाची आपल्यातलाच एकजण चोरी करतोय याचं त्यांना आकलन होत नव्हतं.

मी डॉरमिटरीत सर्वांवर ओरडून विचारलं, 'अरे, तुम्ही आहात तरी कोण? माणसं आहात का?'

'आम्ही ना? आम्ही दरोडेखोर आहोत.' कोपऱ्यातून एक आवाज आला.

मी म्हटलं, 'नाही. तुम्ही दरोडेखोर नाही. तुम्ही छुपे चोर आहात व आपापसात एकमेकांची चोरी करता! आता तुम्हाला चरबी पण नाही व मिठाई पण मिळणार नाही! आपल्याला परत काही या वस्तू कोणी देणार नाहीत. ठीक आहे. तुम्हाला नकोच तर मी तरी काय करणार?'

कुणी तरी म्हणालं, 'आपण काय करणार? आन्तोन, कोण चोरी करतं ते तुम्हालाही माहित नाही व आम्हालाही माहित नाही. काय करणार बरं?'

माझ्या या त्राग्याचा उपयोग नाही हे मी जाणून होतो. मला चक्क माहित होतं की, हे काम कोण्या मोठया मुलाचं आहे व त्याचं नाव सांगायला सारे घाबरतात.

दुसऱ्या दिवशी मी दोन मुलांना बरोबर घेऊन परत शहरातल्या ऑफिसात गेलो. आम्हाला बरेच दिवस खटपट करावी लागली व थोडी चरबी मिळाली. तसंच त्यांनी थोडी मिठाई पण दिली; पण पहिली दिलेली एवढ्या लवकर संपविल्याबद्दल खूप कटकट केली. आम्ही कॉलनीत परत आल्यावर ती मिळवायला आम्हाला किती त्रास झाला याचं आम्ही रसभरित वर्णन केले. ती चरबी आणून आम्ही कोठीघरात ठेवली; पण दुर्दैवाने ती चरबी त्याच रात्री चोरीला गेली!

यामुळे मला बरे वाटले. मला वाटले, आता तरी मुलांच्यात सर्वसाधारण सामूहिक हितसंबंधांची जाणीव होईल व या चोऱ्यांचा शोध करण्याची भावना उत्पन्न होईल; पण काहीच नाही. एकंदरीत सारेजण तसे बेचैन असले तरी हे शोधून काढण्याची ईर्षा कोणी दाखवीत नव्हते. हे इतक्या शिताफीने कोण करतो? याचेच त्यांना उलट आश्चर्य वाटत राहिले.

आणखी काही दिवसांनी घोड्याची कॉलर गेली. त्यामुळे गाडी काढणे व शहरात जाणेही मुष्किलीचे झाले. शेजाऱ्यांच्याकडून दादापुता करून आम्ही ती कधीकधी मिळवीत होतो.

रोजच्या रोज चोऱ्या व्हायला लागल्या. रोज सकाळी काही ना काही वस्तू नाहीशा झालेल्या दिसत होत्या. कधी हातोडी, तर कधी करवत, चादर, लगाम, भांडी वगैरे. मी दोन-तीन दिवस न झोपता पिस्तूल घेऊन सबंध रात्र आवारात फिरत राहिलो; पण रोज कसे हे जमणार? मी असीपोवला एक रात्र पहारा करायला सांगितला; पण तो एवढा घाबरला की, मग पुन्हा मी त्याला किंवा कोणालाच सांगितले नाही!

मला बऱ्याच जणांचा संशय येई. गुड व तारानेटसकट; पण पुरावा मिळत नव्हता. त्यामुळे हात चोळीत बसण्यापलीकडे मला काही करता येत नव्हते.

झादारोव्हने एक दिवस मोठ्यांदा हसून छद्मीपणाने मला विचारले, 'तुम्हाला असे वाटते का, की कॉलनीत फक्त काम करायचे व गंमत करायची नाही? खरोखरच याच्यामागे कुणी आहे असं वाटतं ना तुम्हाला? तर थोडे दिवस थांबा. सारं बाहेर येईल; पण तुम्ही काय कराल चोराला पकडल्यावर?'

'तुरुंगात पाठवीन!'

'बस? मला वाटले खूप चोपून काढाल!'

एका रात्री तो कपडे करून आला व म्हणाला, 'मी तुमच्याबरोबर थोडे पहाऱ्याचे काम करतो.'

'चोर तुझ्याचकरता येणार नाही, एवढे पहा!'

'नाही. तुम्ही पहारा करताहात हे त्यांना माहीत आहे. तेव्हा ते चोरी करणार नाहीत.'

'पण तुला भीती वाटतेय ना झादारोव? कबूल कर पाहू!'

'अर्थात मला चोरांची भीती तर वाटतेच; पण तो खरा मुद्दा नाही. आन्तोन, मला सांगा, आपल्याच दोस्तांचा संशय घेणं बरे का?'

'अरे, पण तुम्हीच तुमची चोरी करीत आहात हे समजतंय का?'

'मी? माझ्याकडे तर इथे काहीच नाही!'

'पण तू इथे राहतोस. नाही का?'

'याला काय राहणं म्हणतात? हे काय जीवन? या कॉलनीतून तुम्हाला काहीच मिळणार नाही. तुम्ही खरोखर याचा नाद सोडा! चोरण्यासारखं सारे गेल्यावर ही पोरं पळून जातील. तुम्ही त्यापेक्षा दोन चांगले बंदुकवाले पहारेकरी ठेवा!'

'ते मी कधीच करणार नाही!'

'का बरे नाही ठेवणार?' झादारोवनं विचारलं.

'पहारेकऱ्यांना पगार द्यावा लागतो हे तुला माहीतच आहे. आपली कॉलनी फार गरीब आहे; पण याउलट तुम्हाला तुमचं समजलं पाहिजे की, हे सारं तुमचंच आहे!'

पहारेकरी ठेवायची कल्पना इतरही मुलांनी सुचविली. आपापसात पण उघड उघड यावर मुलांची चर्चा चाले ती डॉरमिटरीत.

आमच्या दुसऱ्या बॅचमधला चांगल्यातला चांगला मुलगा आन्तोन ब्रातचिन्को म्हणाला, 'पहारेकरी ठेवला की चोरी करायला कोणी धजावणार नाही. त्यातूनही कोणी प्रयत्न केलाच तर त्याला बरोबर प्रसाद मिळेल ! अशा तऱ्हेने तंबी मिळाल्यावर पुन्हा त्या मार्गाला तो जाण्याची शक्यता कमी आहे.'

कोस्टया व्हेतकोवस्की नावाच्या मुलानं या विधानाला विरोध केला. खरं तर तो एका टोळीबरोबर खोटी वॉरंटं घेऊन लोकांची घरं सर्रास धुंडाळीत असे. अर्थात कोस्टचा त्यात दुय्यम भाग घेई; पण मुख्य भाग टोळीतल्या इतर मोठ्या माणसांचा असे. कोस्टचाच्या रिपोर्टात त्याने स्वतः कधी चोरी केल्याचा कुठेही उल्लेख नव्हता. त्याच्या मते तो हे काम काही कारणानं करीत होता व चोरांची त्याला एकंदर चीड असे आणि आहे पण ! या मुलाच्या एकंदर वर्तनाविषयी मला फार कुतूहल वाटायचं. हा मुलगा अतिशय दांडग्या मुलांबरोबर जरवून घेई. त्याचे राजकारणातलं ज्ञान सर्वजण मान्य करीत.

" आन्तोन म्हणतात ते बरोबर आहे. आपल्याकडे पहारेकऱ्यांची मुळीच गरज नाही! " असे कोस्त्या ठासून म्हणाला, " आज आपल्याला समजत नसलं तरी लवकरच आपणा सर्वांना पटेल की, आपल्या कॉलनीत आपणच चोरी करणं हे सपशेल चूक आहे ! आजही आपल्यापैकी अनेकांना ही गोष्ट समजते लवकरच आपण पहारा करायला सुरुवात करू. बरोबर आहे की नाही बुरुन ? " असं बुरुनकडे पाहून तो मुद्दामच म्हणाला.

बुरून म्हणाला, " बरोबर आहे. आपणच पहारा करणं योग्य होईल ! "

फेब्रुवारीतच आमच्या हाउसकीपरने आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. मीच तिला एका इस्पितळात नोकरी पाहून दिली होती. एका रविवारी घोड्याची गाडी तिच्या दारात उभी करण्यात आली आणि तिच्या चहापान-बैठकीत भाग घेणाऱ्या व तिला मानणाऱ्या काही मुलांनी तिच्या साऱ्या पेट्या व पिशव्या गाडीमध्ये भरल्या. ती साधीभोळी म्हातारी मुकाट्याने आपल्या सर्व सामानावर चढून बसली व लॅंडीच्या २ कि. मी. वेगाने जाणाऱ्या गाडीतून तिने आपल्या नव्या आयुष्यात पदार्पण करण्यास कूच केले. रात्री उशीरा गाडी परत आली व त्यातून हाउसकीपरही परत आली.

ती म्हातारी रडतच होती. तिच्या मालकीचे सारे सामान पळविले गेले होते. तसेच तिच्या भक्तांनी व मदतनिसांनी तिच्या बऱ्याचशा पेट्या व पिशव्या गाडीवर न ठेवता खुशाल पळविल्या होत्या. ही अगदी उघडउघड चोरी होती ! मी लगेच कालिनाला, झादारोव्हला व तारानेटला उठवले व साऱ्या कॉलनीभर सामानाचा शोध केला. इतके सामान चोरले होते की ते लपवून ठेवणंही चोरट्यांना मुष्किल झाले होते. तिच्या साऱ्या वस्तू मिळाल्या. कुठे झुडुपात, माळ्यावरनं, काही मुलांच्या खाटांखालून, कपाटापाठीमागे अशा लपवलेल्या सापडल्या. टेबलक्लॉथस्, नॅपकिन्स, चादरी, चांदीचे चमचे, निरनिराळे पेले, एक पोची, कानातले डूल वगैरे वगैरे वस्तू होत्या. म्हातारी खरोखरच श्रीमंत होती !

म्हातारी माझ्या खोलीतच रडत बसली होती. काय झाले ते पहायला मुले जमा होऊ लागली. त्यात तिचे जुने दोस्तही होतेच !

प्रथम मुलांनी कानांवर हात ठेवले; पण मी दम दिल्यावर हळूहळू सत्य उजेडात येऊ लागले. त्यात तिच्याशी विशेष गट्टी असलेल्या मुलांनीच चोरी केली होती; पण त्यांच्याजवळ फालतू वस्तू मिळाल्या. रुमाल, साखरेचे भांडे अशा प्रकारच्या. बुरुनने मात्र त्या सर्वांवर मात केली होती. या शोधामुळे सर्वांना व विशेषतः मला आश्चर्य वाटले. प्रथमपासून बुरुनला मी अतिशय विश्वासू समजत होतो. तो म्हणजे सदा गंभीर पण तरीही मिळूनमिसळून वागणारा, शाळेच्या अभ्यासात अतिशय हुषार असा होता. पद्धतशीरपणे त्याने गठडी भरभरून चोरलेल्या वस्तू पाहून मी तर थक्कच झालो !

आता यावरून पहिल्या साऱ्या चोऱ्या करण्यात बुरुनचाच पुढाकार असला पाहिजे याबद्दल संशय राहिला नाही.

शेवटी एकदाचा वाईट गोष्टीचा सुगावा लागला. मग त्याला आम्ही जनतेच्या कोर्टापुढे उभे करण्याचे ठरविले. प्रथमच या निमित्ताने आम्ही या कोर्टाची सुरुवात केली.

त्याच्याच डॉरमिटरीत सारेजण जमले. डॉरमिटरीत खाटेवर व टेबलावर आमची ज्युरी मंडळी अगदी गंभीरपणे बसली होती. आमच्या डबऱ्यांच्या बत्त्यांच्या उजेडात अत्यंत उत्सुक चेहरे उजळून निघाले होते व त्याच वेळी बुरुनचा पडलेला चेहराही त्यात उठून दिसत होता. त्याच्या भल्या मोठ्या शरीरयष्टीमुळे व जाड गर्दनीमुळे तो अमेरिकन गॅंगस्टरसारखा दिसत होता.

साऱ्या मुलांना मी काय घडले ते थोडक्यात सांगितले. " एका म्हाताऱ्या बाईच्या सामानाची चोरी करणं किती क्षुद्रपणाचं लक्षण आहे ! जिनं कॉलनीत मुलांवर सर्वापेक्षा जास्त प्रेम केलं अशा तिच्याच जवळच्या वस्तू की, ज्यांच्यात तिचा सारा आनंद सामावलेला होता, त्यांची चोरी करणं यासारखा किंवा यापेक्षा दुसरा मोठा विश्वासघात नाही ! माणसानं स्वाभिमानी असावं तसंच स्वतःच्या ताकदीचा गर्व बाळगावा; पण दीनदुबळ्यांची चोरी करण्यासाठी ती वापरू नये. हे वर्तन पशुपेक्षाही खालच्या दर्जाचं आहे. "

माझ्या भाषणाचा परिणाम म्हणून किंवा झालेल्या प्रकाराने रागाने पेटून सारेजण बुरुनवर तुटून पडले. आमचा एरव्ही बावळा दिसणारा ब्रातचिन्को प्रथम बुरुनकडे हात पसरून म्हणाला,

" आता तुला काय म्हणायचंय ? तुला खरं तुरुंगातच टाकायला पाहिजे ! तुझ्यामुळेच कित्येकदा आम्हाला अर्धपोटी रहाण्याचा प्रसंग आला. पैसेही तूच चोरलेस ! "

बुरुन एकदम म्हणाला, ' आन्तोन, सेमियानोविचचे पैसे मी चोरले ? काय पुरावा आहे याला ? पुरावा आणा पाहू ! '

' पुरावा आहेच आमच्याकडे ! ' तारानेट एकदम म्हणाला.

' सिद्ध करा पाहू ! '

' तू चोरले नाहीस असं तुला म्हणायचंय का ? '

' मी घेतले होते असं तुम्हाला म्हणायचंय का ? '

' अर्थात ! तूच ते घेतले होतेस ! '

' मी आन्तोनचे पैसे घेतले हे सिद्ध करून देणाऱ्यानं पुढं यावं ! '

खोलीच्या कोपऱ्यातून तारानेटचा आवाज आला, ' मी ते सिद्ध करणार आहे ! '

बुरुनला आश्चर्याचा धक्का बसला असावा. तो तारानेटवर धावून जाण्याच्या पवित्र्यात होता; पण बहुधा विचार बदलून म्हणाला, ' बरं, समजा, मी चोरले असले तरी परत नाही का ठेवले?'

आश्चर्याची गोष्ट म्हणजे सारी मुले एकदम हसायला लागली. तारानेट अगदी तोऱ्यात पुढे येऊन म्हणाला, ' जाऊ दे; पण त्याला आपण हाकलून देऊ नये. आम्ही सर्वांनीच करू नये ते केलं आहे; पण त्याला चांगली अद्दल घडेल अशी शिक्षा जरूर झाली पाहिजे !'

सारे स्तब्ध होते. बुरुनने तारानेटच्या व्रण असलेल्या चेहऱ्याकडे सावकाश दृष्टी फेकली व मग म्हणाला, ' तू बघ ना प्रयोग करून ! तू ही सर्व धडपड कशासाठी चालवली आहेस ? तू कितीही प्रयत्न केलास तरी तुला कोणी कॉलनीचा मॅनेजर नाही करणार ! मला काय शिक्षा करायची ते आन्तोन बघून घेतील. तुला मध्ये लुड-बुडायचं कारण नाही. तुझा काय संबंध ?'

व्हेनकोवस्की उठला व म्हणाला, ' आमचा संबंध नाही कसा ? बोला रे, आपला संबंध आहे की नाही ?'

' अर्थात ! आहेच की. आपण याला चांगलाच बदडून काढू. आन्तोनपेक्षा आपण ते काम बरोबर चांगल्या तऱ्हेनं पार पाडू !'

एक-दोघे खरोखरच पुढे आले. ब्रातचेन्को मुठी वळवून त्याला धमक्या देतच होता.

' तुला चांगलाच चोपून काढला पाहिजे !'

झादारोव्ह माझ्या कानात कुजबुजला, ' आन्तोन, त्याला इथून बाहेर काढा. नाही तर त्याची धडगत नाही. '

मी ब्रातचिन्कोला बुरुनपासून बाजूला केलं. झादारोवने पण मध्ये येणाऱ्या दोन-तीन मुलांना बाजूला केले. आम्ही गोंगाट कसाबसा आवरला. एवढ्यात ब्रातचेन्को बोलला, ' बुरुन, तुला काय सांगायचं होतं, ते सांग आता !'

बुरुन खाली मान घालून बोलला, ' बोलण्यासारखं काही नाही. तुम्ही म्हणता ते सारं बरोबर आहे; पण मला आन्तोनबरोबर जाऊ द्या. ते मला योग्य ती शिक्षा देतील !'

मी दाराकडे वळलो. माझ्या डोक्यात रागाचा डोंब उसळला होता. माझी मलाच भीती वाटत होती. मुले मला व बुरुनला वाट करून देण्यासाठी दोन्ही बाजूंना पांगली. बुरुन माझ्यापाठोपाठ येत होता.

माझ्या मनाची परिस्थिती फार विचित्र झाली होती. मला त्याचा तिरस्कार वाटला. काय करावे, मला समजेना. तो एका चोरांच्या टोळीतलाच होता. बाकी सारे मोठे होते म्हणून मारले गेले होते. हा वयानं लहान म्हणून सुधारण्यासाठी आमच्या कॉलनीत आला होता.

बुरुन मुकाट्याने खोलीत येऊन उभा राहिला. मी माझा राग कसाबसा आवरला. वाटत होते काही तरी फेकून मारावे व हे संप-वावे.

बुरुनने हळूच मान वर केली व सावकाशपणे माझ्या डोळ्यांकडे पहात येणारे हुंदके कसेबसे दाबीत तो म्हणाला, ' मी पुन्हा कधीही चोरी करणार नाही. '

' तू खोटं बोलतोस. कमिशनपुढंही तू असंच सांगितलं होतंस, खरं ना ?'

' पण आन्तोन, ते कमिशन होतं आणि आता तुम्ही आहात. तुमच्यासमोर मी सांगतोय. माझ्यावर विश्वास ठेवा. वाटेल ती शिक्षा करा; पण मला इथून हाकलून लावू नका !'

' कॉलनीवर एवढा तुझा जीव कशासाठी ?' मी त्याला विचारलं.

' मला खरोखर इथं आवडतं. मला शिकायचंय. मी चोरी केली; पण खरोखर भुकेपायी मी चोरी केली !'

' ठीक आहे; पण ३ दिवस तुला बंद खोलीत रहावं लागेल ! फक्त पाव व पाणी मिळेल आणि तारानेटच्या वाटेला जायचं नाही!'

' ठीक आहे. मला मान्य आहे !' बुरुनला तीन दिवस डॉरमिट-रीच्या शेजारच्या खोलीत ठेवला. पूर्वीच्या कॉलनीचे शिक्षक याच खोलीत झोपत; पण बुरुनला आम्ही कुलपात बंद केला नाही. कारण माझ्या परवानगीशिवाय बाहेर जाणार नाही असा त्याने शब्द दिला होता. पहिल्या दिवशी त्याला खरोखर पाणी व पावच दिला. दुसऱ्या दिवशी मला त्याची दया आली व मी त्याला जेवण पाठविले. त्याने ते नाकारण्याचा मोठा आव आणला. मग मी त्याला बजावले,

' शिष्ठपणा नको हं. मुकाट्यानं जेव पाहू !'

तो मंदपणे हसला, खांदे उडवले आणि त्याने मग जेवण घेतले.

पण बुरुन खरोखर शब्दाला जागला. त्याने पुन्हा कधीही कॉल-नीत किंवा कॉलनीच्या बाहेर कुठेही चोरी केली नाही ! ¤

## प्रकरण पाचवे

# काही महत्त्वाच्या घडामोडी

आजच्या मुलांना त्यांच्याच वस्तूंचा अपहार न करण्यापासून आम्ही परावृत्त करण्यात थोडे-फार यशस्वी झालो होतो; परंतु बाहेरच्या अनेक घडामोडी नेमक्या त्याच्याविरुद्ध वर्तणूक करीत होत्या.

खारकोवच्या मोठ्या रस्त्यावर अशा तऱ्हेच्या घडामोडी दररोज चालू असत. अशी एकही रात्र जात नसे की, ज्या दिवशी कोणी लुटले गेले नाही. आजूबाजूस राहणाऱ्या रहिवाश्यांना जवळच्या शहरातून परत येताना त्यांच्या गाड्या एखाद्या बंदुकीचा धाक दाखवून दररोज अडविल्या जात व क्षणाचीही उसंत न देता भराभर त्यांचे पैसेअडके काढून घेतले जात. कधीकधी हे दरोडेखोर स्त्रियांच्या खिशांतून बेशक हात घालून पैसे पळवीत ! बिचारे त्यांचे नवरे मुकाट्याने चाबकाच्या दांड्याने आपल्याच बुटावर ठकठक करीत व गोंधळलेल्या मनःस्थितीत खालील उद्गार काढीत, ' अहो, आम्ही आमचे पैसे सुरक्षित राहावे म्हणून आमच्याजवळ न ठेवता आमच्या बायकांजवळ ठेवतो; परंतु हे साले सरळ आमच्या बायकांच्या कपड्यांना हात घालून, पैसे लुबाडून घेतात !'

ते सारे कॉलनीत माझ्याकडे तक्रार घेऊन येत व झालेल्या प्रसं-गाचं रसभरित वर्णन करीत. मग मी व मुले आजूबाजूच्या झुडुपात

तपास करायला धावत असू; पण फारसे कधी कुणी हाती लागले नाही.

एकदा मात्र कॉलनीपासून जवळच एक कम्पू मिळाला. आमच्या मुलांच्या आरडाओरडाला त्यांनी बंदुकीच्या एका आवाजाने साथ दिली व ते सारेजण पसार आले. फक्त एकालाच आम्ही पकडून कॉलनीत आणले. त्याच्याजवळ लुटीपैकी काही मिळाले नाही. त्याने गुन्हा सपशेल नाकबूल केला. त्याला आम्ही तिथल्या स्थानिक अधिकाऱ्याच्या स्वाधीन केले. तो एक अट्टल गुन्हेगार आहे असे आढळले व मागाहून त्याच्या कबुलीजबाबावर त्याची सारीच्या सारी टोळी सापडली. स्थानिक कार्यकारी मंडळाने गॉर्की कॉलनीला या कामगिरीबद्दल धन्यवाद दिले !

अशा तऱ्हेच्या सामुदायिक चोऱ्या होत असल्या तरी त्याच्यात रक्तपात होत नसे.

परंतु लूटमारीला काही आळा बसला नाही. चोरांनी बहुधा दुसराच मार्ग पत्करलेला दिसला. हिवाळ्याच्या शेवटाला आमच्या मुलांनी रात्रीच्या वेळी चाललेले काही भयानक प्रकार शोधून काढले.

एक दिवस पाइन झाडाच्या बुंध्यात एक हात दिसला. झाडाखाली उकरून पाहिल्यावर एका स्त्रीचे प्रेत आढळून आले. तिला कोणी तरी गोळी झाडून मारलेले असले पाहिजे. दुसऱ्या एका वेळी रस्त्याच्या बाजूच्या झुडुपामध्ये एका माणसाचे प्रेत सापडले. त्याच्या अंगावर गाडीवानाचा कोट होता व त्याचा मेंदू बाहेर आलेला होता. सर्वांत भयंकर म्हणजे एके दिवशी सकाळी आम्ही उठलो तो दोन प्रेते जंगलाच्या तोंडाशी झाडावर लोंबत असलेली दिसली. कॉरोनर येईपर्यंत दोन दिवस ही प्रेते तशीच लोंबत होती. त्यांच्या बाहेर आलेल्या बटबटीत डोळ्यांनी ते जणू काही कॉलनीकडे बघत होते आणि एकंदर दृश्य फारच भयंकर होते.

असल्या दृश्यांनी आमची मुलं घाबरली तर नाहीतच; पण उलट या असल्या गोष्टीत त्यांना बरीच गोडी वाटली. उलट तो वर्फ उकरून कुठे कधी मेलेल्या मुड्यांची कवटी वगैरे काठीवर लटकावून विशेषतः लिडियाला घाबरवून टाकण्यासाठी कॉलनीत घेऊन येत. आमची शिक्षकमंडळी सदैव भीतीच्या दडपणाखाली असत. त्यांना वाटे की, न जाणो एखादे वेळी खरोखर खारकोवच्या मोठ्या रस्त्याकडचे दरोडेखोर अचानक कॉलनीत शिरतील व साऱ्यांना मारून टाकतील. विशेषतः आसीपोव पती-पत्नींच्याजवळ चोरण्यासारखे बरेच होते. त्यामुळे ते तर सदैव भेदरलेलेच असत.

फेब्रुवारीच्या अखेरीस एके दिवशी संध्याकाळी आमची गाडी सामान भरून तिच्या नेहमीच्या मंद वेगाने शहराकडून कॉलनीकडे येत होती. ती कॉलनीच्या जाणाऱ्या रस्त्याच्या बरोबर वळणावर अडविण्यात आली. गाडीत आमचे धान्य, साखर वगैरे वस्तू होत्या. चोरांना त्यात फारसे तथ्य वाटले नाही. कालिनाजवळ त्याच्या पाइपाखेरीज काही किंमती वस्तू नव्हती. या परिस्थितीत त्यांना आधी काहीही न मिळाल्यामुळे त्यांनी त्याला टप्पल मारून खाली पाडले व ते निघून गेले. ते जाईपर्यंत कालिना तसाच बर्फावर पडून राहिला होता व गुड गाडी चालवीत होता; परंतु हालचाल न करता तो हा झालेला प्रकार तटस्थपणे पाहत होता. ते दोघे कॉलनीत येऊन पोचल्यावर दोघांनीही आपापल्या परीने त्यांच्यावर गुदरलेल्या प्रसंगाचं रसभरित वर्णन केले. विशेषतः कालिनाने अगदी अभिनय करून त्यात नाटय निर्माण केले व गुडने त्यातून निर्माण झालेला विनोद कथन केला; पण त्यानंतर असे ठरले की, कधीही झाले तरी कॉलनीतून ५-६ जणांनी तरी आपली गाडी शहरातून येण्याचे वेळी खारकोव रस्त्याच्या वळणावर जाऊन उभे राहायचे.

हा आमचा नियम आम्ही सतत दोन वर्षे काटेकोरपणे पाळला. आम्ही या प्रकारामुळे त्या रस्त्याला ' घडामोडींचा रस्ता ' असे नाव दिले.

ही सोबतीला जाणारी मंडळी कधीकधी ८–१० जण असत. भीही पुष्कळदा जात असे. माझ्याबरोबर माझे पिस्तुल असायचेच. कारण पिस्तुलाशिवाय आमच्या त्या पहाऱ्याला काही अर्थ नव्हता. ते मी दुसऱ्या कोणाला देत नसे. फक्त झादारोवला देत असे आणि तो ते मोठ्या अभिमानाने आपल्या फाटक्या कपड्यावर कमरेला लटकवी.

रस्त्याच्या टेहळणीचे हे काम सर्वांना फार आवडे. आम्ही कॉलनीच्या रस्त्याच्या वळणापासून अर्ध्या किलोमीटर अंतरावर पुलापर्यंत पहारा करीत असू. मुले बिचारी वर्फात उड्या मारमारून अंगात ऊब आणायचा प्रयत्न करीत. तसेच मोठमोठ्याने एकमेकांना हाका घालीत. उद्देश हा की, चोरांना त्यांचे अस्तित्व जाणवावे व रस्त्याने जाणाऱ्या वाटसरूंचा जीवे मरण्याचा प्रसंग टळावा. त्या रस्त्यात वाहनांची खूप रहदारी असे.

घरी परतणारे खेडूत आपल्या घोड्यांना चाबूक मारीत सावकाशपणे त्या रस्त्याने जाताना दिसत असत. सरकारी अधिकारी व काही सैन्यातील अधिकारी गाड्यांतून जाताना आपल्या बंदुका आमच्या मुलांना दिसतील अशा तऱ्हेने धरीत असत. दरोडेखोरांचे धैर्य खचविण्यासाठी पादचारी गटागटाने पुलावरून जात.

कधीकधी आमची पोरेच रस्त्यावरच्या माणसांना घाबरवून सोडीत; पण मी बरोबर असलो की, असले काही चाळे चालत नसत. मी नेहमी बरोबर जावे असा झादारोवचा आग्रह असे. अशा वेळी पिस्तुल जवळ ठेवण्याच्या आनंदाला त्याला मुकावे लागे. त्याला पिस्तुल जवळ बाळगण्याचा आनंद लाभावा म्हणून, जरी मी गेलो तरी रिव्हॉल्व्हर झादारोवकडेच देत असे.

आमची लॅडी नावाची घोडी आम्हाला लांबून दिसली की, आम्ही मुद्दामच गंमत म्हणून ' थांबा व हात वर करा ' असा इशारा देत असू. अशा वेळी कालिना गाडीत बसलेला असे. तो नुसता स्मितहास्य करी व जोरजोराने पाईपचे झुरके घेई. त्याला भरलेला पाईप वाटभर पुरत असे. ' तो रस्ता केव्हा संपला ते समजलंच नाही, ' असं तो नेहमीच म्हणे.

मग कॉलनीच्या आवारात गाडी शिरताना पोरे लॅडीच्या मागे ओळीने उभी राहात व कालिनाला ' आज काय काय वस्तू शहरातून आणल्या ?' असे विचारून विचारून भंडावून सोडीत.

त्याच वर्षीच्या हिवाळ्यात आमच्याकडे एक महत्त्वाचे काम आले की, जे कॉलनीच्या हितसंबंधापेक्षाही महत्त्वाचे व राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचे होते. त्याचे असे झाले की, एके दिवशी आमच्याजवळच्या जंगलातला रखवालदार आमच्याकडे आला व त्याने आमच्याजवळ मदतीची विनंती केली. तो राखण करीत असलेल्या

राखीव जंगलातून लोक खूप बेकायदा झाडतोड करीत असत व त्याला एकटचाला ते झेपत नव्हते. म्हणून त्याला आळा घालण्यासाठी आम्हाला मदतीसाठी बोलावण्यास आला होता. आम्हाला हा आमचा मोठाच सन्मान वाटला. तसेच हे काम अतिशय जोखमीचे होते व त्यामुळे आमच्या कॉलनीचे महत्त्वही वाढलेच.

कधी रात्री तर कधी पहाटेच्या सुमारास माझ्या खोलीच्या दारावर टक्टक् आवाज येई. उठून पहावे तर कोणी तरी खिडकीच्या काचेच्या तावदानाला आपले नाक घाशीत असलेले दिसे.

'काय आहे रे?'

'आन्तोन, तिकडे झाड तोडल्याचा आवाज येत आहे.' मग मी घाईघाईने कपडे करून माझी बंदूक व रिव्हॉल्व्हर दोन्ही घेऊन बाहेर पडत असे.

एका रात्री असेच झाले. काही तरी विशेष करून दाखविण्याची आवड असलेली आमची काही पोरे– बुरुन, शेलापुटीन वगैरे मला उठवायला आले. मी तयार होऊन निघालो. जाता जाता 'कुठे आहेत ते लाकूडतोडे?' असे विचारलं. त्यावर बुरुन म्हणाला,

'थांबा, ऐका आवाज.'

प्रथम मला काही आवाज आला नाही; पण हळूहळू आमचे श्वासोच्छ्वास व रातकिड्यांच्या आवाजाबरोबरच मंद मंद घाव घातल्याचा आवाज ऐकू येत होता. मग आम्ही आवाजाच्या रोखाने निघालो. मध्येच आवाज थांबे व परत सुरू होई. त्यामुळे कोणत्या बाजूला जावे हे समजेना आणि आम्हाला पुन्हा आवाज येईपर्यंत वाट पहावी लागत होती; पण आवाज पुन्हा सुरू होई, हळूहळू मोठा होत जाई. शेवटी तो बराच जवळजवळ येऊ लागला.

पाइन वृक्षांच्या फांद्यांनी आमचे चेहेरे खरचटत होते. त्यात माझा चष्मा मध्येच पडला. वृक्ष हालल्यामुळे बर्फ आमच्या अंगावर पडे.

चोराला भीती वाटून तो पळून जाऊ नये म्हणून आम्ही हळूहळू जात होतो. मी जरा मागची बाजू पकडली. बुरुन एखाद्या अस्वलासारखा धीमेधीमे चालत होता व शेलापुतीन आपले जाकीट अंगाभोवती घट्ट लपेटून त्याच्यामागे जात होता. आम्ही त्या स्थळी पोचलो व एका झाडामागे उभे राहिलो. एक झाड हालत होते. एक व्यक्ती हळूहळू एका एका झाडावर आपली कुऱ्हाड चालवीत होती. मध्येच थांबे व इकडेतिकडे पाही. पुन्हा आपले काम सुरू करी. आम्ही आता फारच जवळ जाऊन पोचलो होतो. झाड तुटतच आले होते. शेलापुतीन माझ्या बाजूला झुकला व हळूच माझ्या कानात पुटपुटला, 'गोळी झाडू का?' बुरुनने बंदुकीची नळी पावित्र्यात धरली व माझ्याकडे पाहून इशारा केला. मी मानेनेच 'हो' म्हटले. गोळी झाडली गेली व साऱ्या रानात त्याचा आवाज उमटला. त्याबरोबर ती व्यक्ती जमिनीवर सपाट पडली. आम्ही मग त्याच्याजवळ गेलो. कुऱ्हाड अजूनही त्याच्या हातातच होती. इतक्यात बुरुन ओरडला, 'अरे, सलाम मौसी कारपोविच!' एवढे बोलून बुरुनने त्याच्या पाठीवर थाप मारली. मौसी कारपोविच काय बोलणार? तो भीतीने कापत होता. हाताने काटाला लागलेलं बर्फ झटकीत होता.

मौसी कारपोविच अजून बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हता. मी त्याला विचारले, 'तुमची घोडागाडी कुठाय?' त्याची मनःस्थिती पाहून बुरुननं त्याचं उत्तर दिलं, 'ती पहा, तिकडे आहे!' व त्याने तिकडे चलण्याचा इशारा केला. मग कुठे मला पाइन वृक्षांच्यामधून डोकावणारे घोड्याचे डोके दिसले. तो घोडा घसरगुंडी गाडीला जोडलेला होता. बुरुनने कारपोविचला हाताने धरले व 'भाईसाहेब, चला गाडीत बसायला!' असं सांगितलं. आता कुठे कारपोविच भानावर आले व डोक्यावरची टोपी काढून हातात घेऊन व केसांतून बोटे फिरवीत स्वतःशीच कारपोविच पुटपुटू लागले, 'अरे देवा! अरे देवा!' आणि चुळबूळ करू लागले.

आम्ही सारेजण त्यांच्या त्या सारवट गाडीत बसलो. गाडी हळूहळू रस्त्याला लागली. सारा रस्ता बर्फमय झाला होता. एक लहान मुलगा, साधारण १४–१५ वर्षांचा, मोठे बूट व मोठ्या आकाराची टोपी घालून गाडीत बसलेला होता. तो गाडी चालवू लागला. तो बिचारा फारच घाबरलेला दिसत होता.

जंगलाच्या बाहेर पडल्यावर बुरुननं लगाम आपल्या हातात घेतला व त्या पोराला सांगितलं, 'तू कोणत्या रस्त्याने जात आहेस? तू स्वस्थ बैस! तू जर सामान घेऊन जाणार असलास तर, नेहमीच्या वाटेने जाऊ शकतोस; पण आज तू तुझ्या वडिलांना घेऊन जात आहेस व मी दाखवितो त्या वाटेने बरोबर जायला पाहिजे आहे.'

'कॉलनीकडे जायचं?' त्या मुलानं विचारलं. बुरुननं लगाम त्याच्याकडे दिला नाही व घोड्याचं तोंड कॉलनीकडे वळविलं.

आम्ही सारे कॉलनीकडे वळलो. इतक्यात कारपोविचनी घोड्याला ठोकले व माझ्याकडे वळून अजीजीने म्हणाला, 'आन्तोनसाहेब, मला या वेळी सोडून द्या! मी खरोखर आज प्रथमच लाकूडतोड केली. माझ्या घरात जाळायला बिलकुल काही नाही हो!'

बुरुनने कारपोविचचे हात रागाने लगामावरून झटकून टाकले व मी काय म्हणतो ते ऐकायला तो थांबला नाही.

मी कारपोविचला म्हटलं, 'तसं कसं बरं? आपल्याला याची नोंद केलीच पाहिजे. कारण राष्ट्रीय संपत्तीचा तुम्ही अपहार करता. तुमची कैफियत सरकारकडे लिहून कळविणं माझं कर्तव्य आहे!' शेलापुतीन मध्येच म्हणाला, 'ही काही पहिलीच वेळ नाही तर तिसरी वेळ आहे. मागे तुमच्या वॉसिलोला पकडले होते आणि नंतर कोणाला बरं?'

'इथे बोलण्यात काय अर्थ आहे?' असं बुरुन जोरदार आवाजात म्हणाला, 'ए आन्द्रेइ, घरी जा पाहू तू आणि तुझ्या आईला सांग की बाबांना पकडलंय म्हणून. म्हणजे ती त्याला काही चटकन् पाठवू शकेल!'

आन्द्रेइ घाबऱ्याघुबऱ्या गाडीखाली उतरला व त्याने घराकडे धूम ठोकली. आम्ही कॉलनीकडे वळलो. आम्हाला काही पोरे सामोरी आली. ती म्हणू लागली की, 'आम्हाला वाटले की तुम्हाला कोणी तरी मारून टाकील. तुमच्या मदतीलाच आम्ही निघालो होतो!'

यावर बुरुन म्हणाला, 'वा रे वा! आमचं काम आम्ही किती फत्ते केलंय पहा!'

सगळेजण माझ्या ऑफिसात घुसले. मौसी कारपोविच अगदी चेहरा टाकून माझ्यासमोर खुर्चीवर बसला. बुरुन बंदूक धरून खिडकीत बसला होता. काही पोरे माझ्या बिछान्यावर, तर काही बाकांवर पुढे काय होतंय हे पहाण्यासाठी उत्सुकतेने बसली होती.

शेलापुतीन रात्रीची हकीगत रंगवून त्यांना हळूहळू सांगत होता.

मी सारे काही नोंद करायला सुरुवात केली.

'हं कारपोविच, तुमची दोन-अडीच एकर जमीन आहे आणि एक-दोन घोडे आहेत, खरं ना ?'

'बाहेर आहे त्याला काय तुम्ही घोडा म्हणणार ? ते तर खेचर आहे दोन वर्षांचं !'

'बरं, तीन वर्षांचं म्हणा.' असं बुरुन त्यांच्या खांद्यावर थोपटत म्हणाला.

मी पुढं लिहू लागलो, 'सहा इंच खोल झाडाचा बुंधा कापला.' त्यावर कारपोविच उसळून म्हणाला, 'तुम्हाला काय माहीत आन्तोन, की तो सहा इंच होता ! जेमतेम चार इंच असेल !'

त्यावर शेलापुतीन आपली कुजबुजणं थांबवीत, आपले हात अर्धा मीटर एवढे मोकळे करून म्हणाला, 'वा, वा, कारपोविचसाहेब, चांगलं अर्धा मीटर खोल कापलंय. इतकं खोलं होतं ते बरं का !' असं तो कारपोविचपुढे हात दाखवीत म्हणाला.

कारपोविचनं शेलापुतीनकडे दुर्लक्ष केलं व मी काय लिहिलंय ते तो पहात राहिला.

माझी नोंद पुरी झाली. मग कारपोविच उठला व माझ्याशी हस्तांदोलन करून झाल्यावर सगळचात मोठा मुलगा म्हणून बुरुनशी हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे केला व म्हणाला, 'हे तुम्हा मुलांना शोभत नाही हं! शेवटी आपल्याला सान्यांनाच जगायचंय !'

बुरुननं हसून त्याला सांगितलं, हं, हं, असं म्हणू नकोस. आम्ही मदतीला नेहमी तयार असतो.'

एकदम आठवण झाल्यासारखे करून कारपोविच म्हणाला, 'बरं, पण त्या झाडाचं काय, आन्तोनसाहेब ?'

आम्ही विचारात पडलो होतो की, 'नाही तरी झाड जवळजवळ तोडलं गेलं होतं व कोणी तरी ते एकदोन दिवसांत ओढून नेलंच असतं. एवढचात काही सांगायच्या आत बुरुन दाराकडे वळला व आधीच शरमिंदा झालेल्या कारपोविचला म्हणाला, 'साहेब, तुम्ही त्याची काळजी करू नका. आम्ही ते ओढून आणू ! चला रे, कोण कोण येतंय माझ्यावरोबर ? सहा जण पुरेत. बरं, पण दोर आहे का बांधायला कारपोविच ?'

'गाडीलाच दोर अडकविलेला आहे.' कारपोविच म्हणाला.

सारी जणं गेली व अर्ध्या एक तासात ते तोडलेलं झाड गाडीवर घालून घेऊन आली. ही आमची सुरुवात होती. अर्थात ती कुऱ्हाड आम्ही ठेवून घेतली होती व पुढे कित्येक वेळी कुऱ्हाड लागली की ती कारपोविचची कुऱ्हाड कुठं आहे म्हणून आम्ही तिचा उल्लेख करीत असू.

अशा तऱ्हेच्या प्रसंगातून आणि आजूबाजूला विरोधी वातावरणाशी झगडून हळूहळू नीतिमत्तीचे धडे, सहजीवनाची शिकवण मिळवत होतो, तर कधीकधी खूप गप्पा मारीत बसत असू व खूप हसत असू. शिवाय चर्चा करून व आमचेच अनुभव खुलवून आम्ही अडचणीतून मार्ग काढीत जवळ येत होतो आणि खरोखरच खऱ्या अर्थानं आम्ही आमच्या गॉर्की कॉलनीचे अभेद्य भाग बनत गेलो.

[क्रमशः]

# आनंदवन

## बाबा आमटे यांचे नवे स्वप्न

मी आनंदवनात येतो ते नवचैतन्य मिळविण्यासाठी. माझ्या मनाची बॅटरी चार्ज करून घेण्यासाठी—पु. ल. देशपांडे

"आनंदवनात मला जीवनातल्या संगीताचा साक्षात्कार घडतो." —वसंतराव देशपांडे

मोठ्या मोठ्या प्रतिभावंतांची ही स्थिती; मग आमच्यासारख्या सामान्यांचा अनुभव शब्दांत कसा व्यक्त करायचा? आकाशवाणीच्या नागपूर केंद्रावर होतो, तेव्हा एकदा आनंदवनात गेलो होतो. तिथं फुललेलं ते भव्य जीवनकाव्य पाहून विलक्षण खुजेपणा घेऊन आलो. त्या खुजेपणानं दुखावलेल्या अहंकाराचं सांत्वन करण्यासाठी मग दर वर्षीच आनंदवनाच्या मित्रमेळाव्याला जाऊन तिथं जमलेल्या मोठ्या लोकांच्या सहवासात माझा छोटेपणा विरघळवून टाकू लागलो. मला येणाऱ्या चार वेडचा-वाकडचा स्वरांनी समाजाचं मनरंजन करायचा प्रयत्न करू लागलो. अहंकार थोडासा सुखावला. मग आनंदवनाची भेट हे एक व्यसनच होऊन बसलं. आषाढाच्या मेघांनी विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारकऱ्याला बेचैन करावं, तसं शिशिराचे शीत वारे आनंदवनाच्या भेटीसाठी मला बेचैन करू लागतात.

यंदाचा मित्र-मेळावा गेल्या वर्षीप्रमाणे डिसेंबरमध्ये न भरता फेब्रुवारीच्या तीन आणि चार तारखांना भरला.

पु. ल. देशपांड्यांच्या उदारतेनं साकारलेलं आनंदवनाचं मुक्तांगण संध्याकाळी पाच वाजताच गच्च भरून वाहात होतं. उभारलेला भव्य शामियाना पुरत नव्हता. रंगमंचावर स्वतः बाबासाहेब आमटे चाकाच्या खुर्चीत बसलेले होते. पाय मोडला होता पण मनाची जिद्द शाबूत होती !

प्राचार्य राम शेवाळकरांनी सर्वांचं स्वागत केलं. पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, वसंत कानेटकर आणि माधव आचवल यांनी रंगमंचाजवळच्या भव्य समया प्रज्वलित केल्या. त्यानंतर एक एक वक्ते रंगमंचावर येऊन आपलं मनोगत प्रकट करू लागले.

"विकृतीतून आकृती शोधणं हा माझा छंद आहे; पण इथं मानवी विकृतीतून बाबांनी जे सौंदर्य शोधलं आहे त्या कलेपुढं मी नतमस्तक आहे !" —प्रसिद्ध व्यंगचित्रकार मनोहर सप्रे.

"मी संगीताचा सूर शोधीत हिंडत असतो. मला इथं जीवनाच्या संगीताचं पूर्ण सप्तकच गवसलं" —" वसंतराव देशपांडे.

"विचार आणि आचार यांचा पवित्र संगम इथं झाला आहे. बौद्धिक अपंगांना सबल करणारी ही जागा आहे." असे प्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर म्हणाले. त्यांनी या प्रसंगी बाबांच्या जीवनावरच्या एका भव्य नाटकाचा संकल्प जाहीर केला. झुंजार पत्रकार यदुनाथ थत्ते, मराठवाडचाचे तरुण आणि उत्साही प्राध्या-

पक सोमनाथ रोके यांचंही सुंदर भाषण झालं.

"या महाकवीच्या या काव्याचं वर्णन करायला रवींद्रनाथांसारखा महाकवीच हवा." पु. ल. आपल्या समारोपाच्या भाषणात म्हणाले.

या प्रसंगी व्याधिमुक्त रहिवासी सौ. नमिनी हिने बाबांची एक कविता गाऊन दाखवली.

"दुःख या धुळीचे येथे धुंद घाम गाळी
लक्ष लक्ष रक्तामधल्या पेटल्या मशाली"

ती कविता ऐकतांना अंतःकरण कसं भरून आलं !

पुण्याच्या श्री. देशपांडे यांनी या प्रसंगी काही रंगीत स्लाइडस् दाखवल्या. आदिवासींच्या कल्याणासाठी आनंदवनाचे कार्यकर्ते किती कष्ट घेताहेत याची कल्पना त्यावरून आली.

रात्री साडेनऊला संगीत रजनीचा कार्यक्रम होता. गारठ्याला न जुमानता दोन–अडीच हजारांचा समाज शांतपणे बसला होता. धुळ्याच्या सौ. शहांनी बाबांची आवडती कविता म्हटली. त्यानंतर शरद मुठ्यांनी काही विनोदी कविता गाऊन श्रोत्यांना हसवलं. चंद्रपूरच्या एका बाल कलाकारानं तबलावादन केलं. त्यानंतर रंगमंचावर आले अरविंद गजेंद्रगडकर आणि मतदार डी. कुलकर्णी. बासरीच्या युगलवादनासाठी दोघांनी भूप राग निवडला होता. तबल्यावर होते मुंबईचे तरुण कलाकार प्रकाश सावंत आणि श्रीरंग चौवळ. बासरीची साथ करीत होते अक्षय कोहजकर. या रंगलेल्या भूप रागानंतर एक भटियाली धुन वाजवून टाळ्यांच्या गजरात त्यांनी आपलं बासरीवादन संपवलं. त्यानंतर लोकाग्रहास्तव अरविंद गजेंद्रगडकर यांनी स्वरमंडल वाजवलं.

वसंतराव देशपांडे यांनी सहजपणे बोलत बोलत गात गात 'नाट्यसंगीताची वाटचाल' श्रोत्यांच्या पुढे मांडली. शाकुंतलाच्या नांदीपासून ते अलीकडच्या नाटकातल्या पदापर्यंत नाट्यसंगीतानं घेतलेली वळणं त्यांनी सुरेख उदाहरणं देऊन विशद केली. रात्री दोन वाजता संपलेल्या कार्यक्रमानं श्रोत्यांना तृप्त केलं.

रविवारी चार तारखेला सकाळी मुक्तांगणाचं आवार पुन्हा एकदा माणसांनी फुललेलं. बालतरूंची पालखी अनेक रंगी पर्णफुलांनी सजली होती. त्या पालखीची मिरवणूक निघाली तेव्हा तिच्यासमोर ढोल–लेझीम तर होतीच, पण स्वतः पु. ल. देशपांडे, अरविंदजींच्या सहकाऱ्यांबरोबर बासरीचे स्वर घुमवीत होते. प्रभाकर पणशीकरांनी 'देवकीनंदन गोपालाचे सूर पहाडी आवाजात घुमवले. वसंतराव देशपांडे टाळांच्या तालावर नाचत होते. अभूतपूर्व दृश्य होतं.

एका आवाराजवळ मिरवणूक थांबली. व्याधिमुक्त रहिवाशांनी अनेक अद्‌भुत कसरती करून दाखवल्या. अपंग समाजल्या जाणाऱ्या त्यांच्या त्या कसरतींनी धडधाकटांना लाजवलं. मुंबईच्या काही मुलींना रहावेना. त्या आपल्या घंटाकृती विजारींची पर्वा न करता खुशाल फुगडया खेळून धुळीनं स्वतःचं अंग माखून घेऊन धन्य झाल्या !

मिरवणूक पुढे चालली आणि उत्तरायणापाशी स्थिरावली. उत्तरायण ! बाबांनी गेल्या वर्षी उत्तरायणाचा संकल्प सोडला आणि त्या ओसाड भूमीवर एका वर्षात अनेक टुमदार इमारती उभ्या राहिल्या. सगळा परिसर फुलांनी बहरला..त्याच उत्तरायणाच्या व्यासपीठावर बाबांनी नवा संकल्प जाहीर केला. 'गोकुळ !' समाजानं अव्हेरलेल्या बालगोपालांना मायेनं जवळ करणारं गोकुळ !

याच वेळी प्रभाकर पणशीकर, वसंत कानेटकर, माधव आचवल, मनोहर सप्रे, प्रकाश मोहाडीकर इत्यादी मंडळींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं. त्यानंतर अनामवृक्षाच्या स्मरणशिलेवर पु. ल. देशपांडे यांनी पुष्पचक्र वाहिलं. मानवी वस्ती वाढविताना ज्या अनेक वृक्षांची तोड करण्यात आली त्या वृक्षांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सुंदर समारंभ होता.

समारंभ संपला ! एका भव्य आणि दिव्य अनुभवाला हृदयाच्या गाभाऱ्यात साठवून, एका नव्या ज्योतीने स्वतःचं जीवन ज्योतिर्मय करून मंडळी गावोगावी परतली !

–अरविंद गजेंद्रगडकर


## प्रसिद्ध झाले

# टॉलस्टॉय – एक माणूस

लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

भूमीवर या संमेलनाला आगळे महत्त्व होते.

न्या. शहा यांनी आपल्या उदघाटनाच्या भाषणात तीस वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळविताना सामान्य जनतेने व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी विद्यार्थी-युवकांनी झटावे असे आवाहन केले. श्री. शहा यांनी आपल्या देशात लोकशाहीचा निष्प्राण सांगाडा उरला असल्याचे सांगून खऱ्या अर्थाने लोकशाही जोपासण्याची जबाबदारी तरुण पिढीवर असल्याचे सांगितले. आणीबाणीतील गुन्ह्यांच्या संदर्भातील चौकशीचे कामकाज संपल्यानंतर न्या. शहा प्रथमच सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेत होते. त्यामुळे ते काय बोलतात हे ऐकण्यासाठी मोठ्या अपेक्षेने श्रोते जमले होते. विद्यार्थीवर्गातही याबाबत औत्सुक्य होते; परंतु त्या दृष्टीने श्री. शहा यांच्या भाषणात वैशिष्टचपूर्ण असे काहीच नव्हते हे नमूद केले पाहिजे.

शहा यांच्या भाषणानंतरच्या सत्रात अ. भा. वि. प. चे अध्यक्ष प्रा. बाळ आपटे यांनी विद्यार्थी परिषदेच्या, देशातील राजकीय-सामाजिक परिस्थितीच्या संदर्भातील धोरणांचे विस्तृत विवेचन केले. केवळ शासन बदलून भागणार नाही, तर सामाजिक परिवर्तन हेच देशातील बहुसंख्य समस्यांचे उत्तर आहे असे त्यांनी सांगितले.

या मेळाव्याचे एक वैशिष्टच म्हणजे यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना आपापली मते मांडण्यासाठी मेळाव्याच्या संयोजकांनी एक व्यासपीठ निर्माण करून दिले होते. गटशः चर्चेच्या एका सत्रात शिवडी, लालबागपासून गोरेगाव, चेंबूर, मुलुंडपर्यंत विविध उपनगरांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी प्रचलित शैक्षणिक व्यवस्थेत आपल्याला भेडसावणारे प्रश्न मनमोकळेपणाने मांडले 'नोकरशाहीच्या वरवंट्याखाली सामान्य विद्यार्थी कसा भरडला जातो हे जाणून घेण्यासाठी ह्या सत्राचा विशेष उपयोग झाला व विद्यार्थ्यांच्या अगणित समस्यांचे स्वरूप अधिक स्पष्ट झाले,' असे या सत्राबाबत माहिती देताना, परिषदेचे संघटनमंत्री श्री. रवी कर्वे यांनी सांगितले.

या अधिवेशनवजा मेळाव्यात जे दोन प्रस्ताव संमत झाले ते विशेष उल्लेखनीय आहेत. मुंबई विद्यापीठातील अनागोंदीचे स्वरूप स्पष्ट करणारा प्रस्ताव म्हणजे जणु विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांची कैफियतच आहे. या ठरावात म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्रात नवा अभ्यासक्रम लागू होऊन आता चार वर्षे होतील. पुढच्या वर्षी नव्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी + ३ या टप्प्यातील अंतिम वर्षाचे शिक्षण घेतील. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे सारे इतक्या उंबरठ्यावर आले असतानाही या म्हणजे अंतिम वर्षाचा अभ्यासक्रम व त्याची नीट व्यवस्था विद्यापीठाकडे तयार नाही.

विद्यापीठाने नव्याने लागू केलेल्या पायाभूत अभ्यासक्रमाने बरेच वादळ उठविले होते. या अभ्यासक्रमातील Applied Componants हा विषय गेल्या वर्षाऐवजी या वर्षी शिकविण्यात येत आहे. इतक्या विलंबानंतर हा विषय शिकविला जात आहे; पण अद्यापही या विषयावर विद्यार्थ्यांना अभ्यासण्याची पुस्तके उपलब्ध नाहीत. हा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण व्हावा म्हणून विद्यापीठाने विज्ञानाच्या प्रयोगांचे तास (Practicals) कमी करण्याचा फतवा काढला आहे; परंतु त्यामुळे दुसऱ्या सत्रातील प्रयोगांचा अभ्यासक्रम अपूर्ण रहाणार आहे. ह्या ठरावात म्हटल्याप्रमाणे, 'विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचा अदूरदर्शीपणा, निष्काळजी वृत्ती व कल्पनाशून्य व्यवहार यांचाच हा परिणाम आहे.'

या ठरावात या मेळाव्याने केलेल्या काही मागण्या विशेष महत्त्वाच्या आहेत. विद्यापीठातील भ्रष्टाचार व गैरकारभाराच्या चौकशीसाठी कुलपतींनी झा समिती, निझामुद्दीन समिती आणि इराणी समिती अशा तीन समित्या नेमल्या होत्या; परंतु ह्या समित्यांचे अहवाल अद्याप प्रसिद्ध करण्यात आलेले नाहीत. हे अहवाल ताबडतोब प्रसिद्ध करावे आणि दोषी व्यक्तींना शासन केले जावे ही एक अत्यंत उचित मागणी आहे. ह्या सर्व समित्यांचे अहवाल प्रसिद्ध करण्यात विद्यापीठाला कोणती अडचण आहे? की अहवाल प्रसिद्ध करण्यामुळे काहीजण अडचणीत येणार आहेत? विद्यापीठाने याचा जरूर खुलासा केला पाहिजे.

मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र वाढवून आता बरीच वर्षे झाली; परंतु ठाणे, कुलाबा, रत्नागिरी भागातील विद्यार्थ्यांची जबाबदारी आपल्यावर आहे याची विद्यापीठाला फारशी जाणीव नाही. रत्नागिरी-गोवा भागातील विद्यार्थ्यांना अनेकदा साध्या गुणपत्रिकेसाठी मुंबईपर्यंत यावे लागते. तसेच आरोग्यकेंद्र आणि अन्य उपक्रमांचाही मुंबईबाहेरील विद्यार्थ्यांना लाभ मिळत नाही. या व अशा अनेक समस्यांच्या सोडवणुकीसाठी विद्यापीठाने एक समिती नेमावी अशी मागणी या ठरावात करण्यात आली आहे.

याशिवाय सर्वसाधारण महाविद्यालयात ज्यांना शिक्षण घेता येत नाही त्यांच्यासाठी सकाळची महाविद्यालये सुरू करणे, विद्यापीठाच्या सर्व समित्या व मंडळे यांच्या त्वरित निवडणुका घेणे इ. मागण्यांचाही ठरावात समावेश आहे. विद्यापीठातील ही सगळी परिस्थिती पाहता विद्यापीठाची उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींकरवी चौकशी करावी ही परिषदेने केलेली मागणी स्वाभाविकच म्हटली पाहिजे.

दुसऱ्या एका ठरावान्वये राज्य सरकार शिक्षणक्षेत्राबाबत जी बेपर्वाई दाखवीत आहे त्याचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. शासनाने विद्यापीठाच्या विधिसभेने संमत केलेल्या ठरावाचा आदर करून विद्यापीठाची स्वायत्तता राखावी असे या ठरावात म्हटले आहे.

या एक दिवसाच्या मेळाव्याच्या अखेरीस निघालेल्या भव्य शोभायात्रेनंतर झालेल्या खुल्या अधिवेशनात परिषदेचे एक विभागीय संघटनमंत्री श्री. गोविंदाचार्य यांचे भाषण झाले. आपल्या ओघवत्या शैलीत आणि मुंबईत क्वचितच ऐकावयास मिळणाऱ्या विशुद्ध हिंदीत श्री. गोविंदाचार्य यांनी विद्यार्थी परिषदेचा इतिहास व नवी आव्हाने यांचा आढावा घेतला.

या आणि अशा मेळाव्यात होणारी भाषणे, प्रस्ताव, चर्चा इ. ना एक वेगळा अर्थ असतो. हे सारे घडविण्यात येते ते उपस्थितांना समस्यांची जाणीव करून देण्यासाठी. समस्यांची व आव्हानांची जाणीव झाल्यावर प्रत्येकाने कार्यरत होणे हेच खरे अधिक महत्त्वाचे. सांख्यिक प्रतिसादाच्या दृष्टीने हे संमेलन निश्चितच यशस्वी झाले, ते सुजाण विद्यार्थ्यांना कार्यरत करण्यातही यशस्वी ठरावे हीच अपेक्षा. □

# पुणे वार्ता

## पुण्यातील औद्योगिक अशांतता

गुरुवार दि. ८ फेब्रुवारीचा पुण्यातील वर्तमानपत्रांमध्ये पुढील निवेदन प्रसिद्ध झालं होतं.

**' कार्यक्रम स्थगित '**

श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या वयाची ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या शुभप्रसंगी अभिनंदनपर कार्यक्रम पुणे येथे दि. १८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी श्री. जी. डी. बिर्ला यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे मान्य केले होते. इंटर नॅशनल चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. मॅक ग्रेगर यांनी अध्यक्षपद स्वीकारले होते. गेल्या काही दिवसांत कामगार वर्गातील काहींकडून या प्रसंगी तीव्र निदर्शने केली जाण्याच्या शक्यतेच्या बातम्या आमच्या कानी आल्या आहेत व त्यामुळे गडबड-गोंधळ निर्माण होण्याची धास्ती वाटते.

आयोजकांच्या सद्भावना लक्षात घेता या शुभप्रसंगी कोणत्याही प्रकारच्या विपरीत घटना घडू नयेत, या उद्देशाने हा कार्यक्रम स्थगित करण्याचा दुःखद निर्णय घ्यावा लागत आहे. या निर्णयामुळे अनेक देशांतील लोकांची गैरसोय व निराशा होईल, याबद्दल कमिटीस दिलगिरी वाटत आहे.

अध्यक्ष
स्वागत समिती
एस्. एल्. के. अमृतमहोत्सव समिती

या निवेदनानंतर लगेचच म्हणजे शनिवार दि. १० फेब्रुवारीच्या वर्तमानपत्रांमध्ये पुढील निवेदन प्रसिद्ध करण्यात आले.

**माननीय श्री. शंतनुराव अमृत-महोत्सव कार्यक्रम स्थगितीबद्दल किर्लोस्कर कामगारांचे निवेदन.**

दि. ८-२-७९ रोजी सर्व वर्तमानपत्रांत श्री. शंतनुराव अमृतमहोत्सव समितीचे अध्यक्ष यांनी सदरहू कार्यक्रम स्थगित करण्याबावत जे कारण दिले आहे ते अत्यंत दुःखद, निराधार, अयोग्य व बेपर्वाईचे आहे. मा. श्री. शंतनुराव यांना व्यक्तिशः किर्लोस्कर उद्योग समूहातील कामगार कुटुंबप्रमुख म्हणून मानतात व कामगारांनी सुमारे नऊ महिन्यांपूर्वी त्यांचा जाहीर सत्कार त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त करून त्यांच्याबद्दलच्या सद्भावना दाखविल्या आहेत. त्यांच्याबद्दल पूर्वी, आज व पुढेही याच भावना आणि आदर कायम राहाणार आहे हे निश्चित. किर्लोस्कर ग्रुपमधील निरनिराळ्या व्यवस्थापनातील काही आपमतलबी, असंतुष्ट, कुटिल अधिकाऱ्यांना हे पाहावत नाही आणि म्हणून मा. श्री. शंतनुराव व त्यांचे प्रिय कामगार यांच्यामध्ये दुरावा निर्माण करण्याच्या हेतूने कामगारांना अशा तऱ्हेने बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत व महोत्सवप्रसंगी हे कामगार तीव्र निदर्शने करणार आहेत अशा अफवा मुद्दाम उठवून शुभकार्य स्थगित करण्याचा डाव हे लोक खेळत आहेत, त्याबद्दल त्यांचा निषेध करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाच्या संयोजकांनी अशा अफवा कानी आल्यावर कामगार महामंडळाच्या प्रतिनिधींकडे याबाबत विचारणा केली असती तरी वरील अफवा किती फोल आहेत हे त्यांना समजले असते; पण अशा प्रकारची विचारणा न करता ह्या कार्यक्रमाची तयारी वर्तमानपत्रातील एका जाहिरातीने स्थगित करावी हे चमत्कारिक आहे. मा. श्री. शंतनुरावजी यांना परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो हीच आम्हा सर्व कामगारांची प्रार्थना आहे.

सदरहू कार्यक्रमाच्या संयोजकांना उद्योग-समूहातील सर्व कामगारांच्या वतीने जाहीर विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सदरहू कार्यक्रम स्थगित करण्याचे रद्द करून हा कार्यक्रम जास्तीत जास्त चांगला करावा. वरील कार्यक्रमाबद्दल जरी कामगारांना काहीही विचारले नसले व विचारण्याची इच्छा नसली तरी कार्यक्रम पार पडण्याच्या दृष्टीने कामगारांतर्फे संपूर्ण सहकार्य जाहीर करण्यात येत आहे.

**( सदाशिव कुल )**
अध्यक्ष, किर्लोस्कर उद्योग समूह
कामगार महामंडळाकरिता.

ही दोन्ही निवेदने या ठिकाणी संपूर्ण उद्धृत करण्याचे कारण असे की पुण्या–मुंबईच्या औद्योगिक परिसरातील वातावरण किती झपाट्याने आणि किती वेगळ्या दिशेने बदलत जात आहे याची यावरून सहज कल्पना यावी. संप, सत्याग्रह, निदर्शने, टाळेबंदी हे औद्योगिक क्षेत्रात नवीन नाही. त्या संदर्भात व्यवस्थापन आणि कामगार यांच्याकडून वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध केली जाणारी, परस्परांवर दोषारोप करणारी निवेदनेही सामान्य नागरिकाला अपरिचित नाहीत; परंतु ज्या कार्यक्रमाचा उद्योगधंद्याशी किंवा त्यातील अडचणी, समस्या, पेचप्रसंग यांच्याशी दुरूनही संबंध नाही, असलाच तर एवढाच की, एका उद्योगपतीभोवती हा कार्यक्रम गुंफलेला आहे, असा कार्यक्रम कामगार गोंधळ घालतील, हुल्लडबाजी करतील या भीतीने संयोजकांना स्थगित करावा लागावा आणि नंतर कामगार–नेत्यांना त्याचं स्पष्टीकरण द्यावं लागावं ही गोष्ट मात्र निश्चितच यापूर्वी कधीही न घडलेली आणि म्हणूनच चिंतनीय आहे. पुण्या-मुंबईच्या औद्योगिक परिसरात जो दहशतवाद नव्यानेच मूळ धरू लागला आहे त्याचे हे द्योतक आहे. आजपर्यंत कामगार वर्गात आपापसातच मतभेद, वैमनस्य, गुंडगिरी, मारामारी हे प्रकार चालत

होते आता त्याला मालक विरुद्ध कामगार असे सरळ सरळ स्वरूप येत आहे. गेल्या महिन्यात मुंबईमध्ये प्रसिद्ध उद्योगपती श्री. गोदरेज यांच्यावर झालेला खुनी हल्ला हाही याचेच उदाहरण आहे.

याबाबत पुण्यातील कामगार-नेते, व्यवस्थापनातील अधिकारीवर्ग आणि पोलीस खातं यांची मते विचार करण्यासारखी आहेत.

कामगार-नेते श्री. ए. डी. भोसले यांचे म्हणणे असे की, अशा प्रकारचा दहशतवाद निर्माण व्हायला कारखानदारच जबाबदार असतात. त्यांचा कामगारांबद्दलचा दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित असतो. कामगार हा गुन्हेगार आहे, दहशतवादी आहे अशी लेबल्स बेजबाबदारपणे लावली जातात. ' कामगार स्वार्थी असतात ' हे इंदिराजींचे वाक्यच अजून बरीच मंडळी वारंवार उच्चारत असतात. थोडे यापुढेही जाऊन श्री. भोसले म्हणतात की, एखाद्या उद्योगपतीवर चाकूहल्ला झाला तर त्याचा एवढा गवगवा; पण कापऱ्याला अमानुष गोळीबार केला गेला त्याची मात्र कोणी फारशी दखल घेतली नाही. ते गोळ्या खाणारे काय भिकारी होते? कामगारांपैकी काहीजण हिंसक प्रवृत्तीचे असतीलही; पण त्यावरून सबंध कामगार वर्गावरच ठपका ठेवणे अन्यायाचे होईल. तसेच असे कृत्य करायला कामगार प्रवृत्त का होतात, हेही पाहिले गेले पाहिजे.


व्यवस्थापनातील अधिकाऱ्यांचे म्हणणे असे की, बहुतेक वेळा पगारवाढ किंवा महागाई भत्त्यासाठीच हे संप होतात; पण हे मागत असताना कंपनीचा नफा किती आहे किंवा दुसऱ्या एखाद्या कंपनीत त्याच दर्जाच्या कामगाराला पगार किती दिला जातो याचा हिशेब संप-नेते करत असतात. हा दृष्टिकोन चुकीचा आहे. कामगार नफ्यात वाटा मागतात; पण जर तोटा झाला तर कोणता कामगार त्यात वाटा उचलणार आहे? या सर्व पार्श्वभूमीवर सध्याची पुण्या-मुंबईच्या औद्योगिक परिसरातील अस्वस्थता सबंध देशाच्या दृष्टीने चिंतनीय बाब आहे.

सध्या पुण्याच्या औद्योगिक क्षेत्रात रोज किमान दहा ते बारा उद्योगसमूहांमध्ये बंदोबस्ताचे काम करावे लागणाऱ्या पोलिसांचे म्हणणेही या वादामध्ये महत्त्वाचे आहे. परिस्थिती आटोक्याबाहेर जायला लागली तरच आम्ही हस्तक्षेप करतो, असा पोलिसांचा दावा. पोलिसआयुक्त श्री. सहस्रभोजने यांनी तर असेही सांगितले की, पोलिसांच्या (महाराष्ट्र) अधिकारात सरकारकडून काय वाढ केली जाते त्याची आम्ही उत्सुकतेने वाट पहात आहोत.

म्हणूनच गेल्या आठवड्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार पुण्यात आले असताना सर्किट हाउसवर हॉलची दारे बंद करून घेऊन एक खास बैठक झाली. पुण्याचे पोलिसआयुक्त श्री. सहस्रभोजने, महानगरपालिका–आयुक्त श्री. पाळंदे, श्री. रा. ग. गुप्ते आणि इतर वरिष्ठ अधिकारीवर्ग या बैठकीला उपस्थित होता. पुण्यातील औद्योगिक अशांततेवर तोडगा काढण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली असेही कळते. अर्थात त्याची फळे दिसायला थोडा काळ जावा लागणारच. □

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# अलवरा डाकू
## घाशीरामचा चुलतभाऊ !

'अलवरा डाकू' या (बालनाट्याच्या शीर्षकासारख्या वाटणाऱ्या पण-) आकर्षक नावाच्या दोन अंकी नाटकाचा प्रयोग पुण्यात व्हायच्या आधीपासूनच त्याच्याविषयी खूप अनुकूल आणि खूप प्रतिकूल अशा प्रतिक्रिया ऐकायला मिळत होत्या. आता प्रयोग होऊन गेल्यानंतरही अशाच वैविध्यपूर्ण, दोन्ही टोकांच्या प्रतिक्रिया ऐकू येत आहेत. खूप मतभेद कानांवर येतात. प्रतिकूल प्रतिक्रियांची संख्या सर्वसाधारणपणे जास्त. अर्थात मला स्वतःला हे नाटक (त्यातल्या उघड दोष-उणीवांसकटही) आवडलं, हे प्रथमच नमूद करायला हरकत नाही. ज्यांच्याविषयी आस्थेनं काही लिहावं, उलटसुलट चर्चा व्हावी असे प्रयोग रंगभूमीवर दुर्मिळ होत चालले असताना 'सीता' किंवा 'अलवरा डाकू' सारखे प्रयोग टीकेचं लक्ष्य ठरले तरी स्वागतार्ह वाटतात.

'या मंडळी सादर करू या' हे सादरकर्त्या संस्थेचं नाव. लेखक-दिग्दर्शक-संगीतकार श्री. पुरुषोत्तम बेर्डे. 'लोकांनी लोकांसाठी, लोकांचा निर्मिलेला अलवरा डाकू' असं बिरुद त्यांनी नाटकाला लावलं आहे, त्याचं औचित्य काही फारसं जाणवत नाही. People's Theatre ची संकल्पना यामागं कुठं तरी असावी असं वाटतं, पण त्यासाठी इतका जुनाट गुळगुळीत शब्दसमूह वापरण्याची गरज होतीच का? 'नाट्यानंद हा केवळ रंगमंचावर नसतो, केवळ प्रेक्षकातही नसतो. असतो तो दोघांच्या परस्पर संबंधात,' ही या संस्थेची नाट्यविषयक भूमिका स्वागतार्ह आहे. 'अलवरा डाकू' ची मध्यवर्ती विचारधारा, नाट्यप्रयोगावेळी प्रेक्षकांना देण्यात आलेल्या माहितीपत्रकात दिली आहे, ती अशी-

'अलवरा अंग धरत जातो,.. अशाच रस्त्यावर खेळ दाखवून उपजीविका करणाऱ्या कलाकारांच्या खेळातून

एक भीषण खेळ

सर्व व्यापी.. सर्वस्पर्शी

आपल्याला निर्जीव प्यादी बनवणारा

आपणच नियमांच्या उभ्या-आडव्या चौकटी मारायच्या

यशाच्या शिड्या आणि अपयशाचे अजगर मांडायचे

आणि सुरू करायचा खेळ......

यात आपणच गुलाम होतो आपल्या खेळाचे

निश्चित फक्त नसते, केव्हा कुठे आणि कसे

अजगराचा घास होणे किंवा शिडीचा पाईक होणे'

तेव्हा पडदा उघडताच पार्श्वभूमीला पडद्यावर साप-शिडीचा रेखीव पट दिसतो आणि एक गारुडी-अर्थात जिवंत. हा गारुडी जी बडबड सुरू करतो, त्यात विषयांतराला भरपूर वाव आहे. त्याचा फायदा तो घेतोही. उदाहरणार्थ, 'जय काली कलकत्तेवाली' अशी गर्जना केल्यानंतर दुष्मन की नर्ली तोडण्याबद्दल तो जे सविस्तर आख्यान लावतो, त्याचा relevance मला काही कळला नाही; पण गारुड्याचा प्रस्तावनात्मक मोनोलॉग संपून 'खेळ' सुरू होतात, तसतसा नाटकाला रंग भरत जातो. गोंधळी, भुत्ये असे खेळकरी येऊन जातात आणि अलवरा डाकूपर्यंत विषय येऊन ठेपतो. एव्हाना नाटकाला असलेलं प्रतीकात्मतेचं अस्तर स्पष्ट होत आलेलं असतं. खुर्चीचं प्रतीक रंगमंचावर खेळकऱ्यांद्वारे साकार झालेलं असतं. 'खुर्चीकडे जायचंय् तर आडमार्गानं जा' असा स्पष्ट विषयनिर्देश करणारा सल्ला देऊन गारुडी-कम्-सूत्रधार मोकळा झालेला असतो. अशा वेळी सुरू झालेला अलवरा डाकूचा शोध प्रेक्षकातल्याच एकाची निवड करून संपतो आणि संमोहनविद्यासदृश तंत्रानं गारुडी एका दुबळ्या प्रेक्षकातून दमदार डाकू उभा करतो, तेव्हा सगळं कसं लख्ख होऊन जातं! अलवरा डाकू हा घाशीरामचा सख्खा चुलतभाऊ लागतो असं मी सुरुवातीलाच म्हटलं, ते त्या दोघांच्या जन्मकथेपासून, कुलवृत्तांतापासूनच.

तर माणसाचा हैवान कसा होत जातो याचा आलेख हाच घाशीरामप्रमाणे अलवराचाही विषय आहे. या मध्यवर्ती कल्पनेभोवती या उभारलेल्या दृश्यबंधांनी या दोन्ही नाटकांचं कथानक विणले जाते. एवढेच की घाशीरामची सफाई अलवराच्या लिखाणात थोडी कमी आढळते. म्हणजे असे की 'घाशीराम'मध्ये एका स्खलनशील समाजाच्या (decaying society) पार्श्वभूमीवर व्यक्तिगत भ्रष्टाचाराचं चित्र तेंडुलकर जितक्या रेखीवपणे चितारतात, तितका आखबंदपणा अलवराच्या लिखाणात दिसत नाही. याचं एक कारण असं की अलवरामध्ये एकीकडे साप-शिडी व सफरचंदासारखी प्रतीकं (:-अॅडम व ईव्हचा संदर्भ), खुर्चीसारखी प्रतीकं येऊन जातात, जी माणसाची सुधारणा, राजकारणातील भ्रष्टाचार, गळेकापू स्पर्धा यासारखे विषय हाताळतात. त्याखेरीज सामाजिक विषमता, आर्थिक विषमता-आहे रे व नाही रे वर्गांतील संघर्ष अशा काही विषयांचा स्पष्ट व सविस्तर उल्लेख होतो. शासनव्यवस्थेवर टीकाटिप्पणी चालते. आता एका कॅनव्हसवर तुम्ही किती किती आणि काय काय म्हणून चितारू शकणार? साहजिक या सगळ्या थीम्स् कुठे मिसळतात, कुठे वेगळेपणानं उठून दिसतात तर कुठे पुनरावृत्तही होतात. (उदा. सफरचंद!) परिणामी एक एकसंध अनुभव, एक अंतिम परिणाम नाटकाकडून अपेक्षिणाऱ्या प्रेक्षकांचा एक तर गोंधळ उडतो किंवा निराशा होते. दुसरं असं की, घाशीराम नाटकाला असलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी (तेंडुलकरादिकांनी नाकारली तरी) इतकी भक्कम आहे की नाना-घाशीराम संघर्षाचे कथानक योग्य संदर्भ-चौकटीत बसवणे प्रेक्षकांना सहज शक्य व्हावे. अलवरा डाकूच्या बाबतीत बहुधा ही कथावस्तू, स्थलकालस्थितिनिरपेक्ष सत्य बनविणाऱ्या दृष्टिकोनातून अथवा अन्य काही कारणासाठी नाटकाची राजकीय-सामाजिक पार्श्वभूमी बरीचशी संदिग्ध ठेवण्याकडे कल दिसतो. एरवी प्रचलित समाजव्यवस्थेच्या/राज्यव्यवस्थेच्या पार्श्वभूमीची ठाम, सुस्पष्ट चौकट नाटकाला घालणं अशक्य नव्हतं. शिवाय चांगली कलाकृती ही संपूर्णतः तात्कालिक/स्थलकालस्थितिसापेक्ष असतानाच मूल्यात्मक पातळीवर शाश्वत व वैश्विक

असू शकत नाही का ?

मर्मभेदकता हे अलवराच्या लेखनाचं मला आवडलेलं एक वैशिष्टच. 'राजकारणाच्या खेळात एखाद्याला असा पाडायचा की तो राज्यपालच झाला पाहिजे!' यासारख्या फर्मास कॉमेन्ट्स्, दुसऱ्या अंकाच्या सुरुवातीचा जातीयवादावरचा प्रखर हल्ला, बिदाभोवती घडणारे प्रसंग आणि 'नरभक्षक असलो तरी आम्हीही कुणाचे तरी पाळलेले असतो' ही अलवराला झालेली असहाय जाणीव यांचा उल्लेख या दृष्टीने करावासा वाटतो. उपरोधाच्या अस्त्राचा वापर या दृष्टीनं योग्य करून घेण्यात आला आहे. दोष आढळतो तो एवढाच की, विविधांगी भ्रष्टाचाराबद्दल जे गंभीर मंथन नाटकात चालते, त्याचा वैचारिक दर्जा खास असामान्य नाही, ज्याचं एक कारण नवीन विचाराचा अभाव हे असू शकेल. लेखकाच्या कॉमेन्ट्स् वगैरे बहुशः वैचारिकदृष्टचा प्राथमिक पातळीवरच राहतात. लेखन व प्रस्तुतीकरणाच्या दृष्टीने त्यात उठावदारपणा, काहीसा भडकपणाही असला, तरी सूक्ष्मता (subtlety) आणि गुंतागुंत (complexity) नाही.

'अलवरा'वर आक्षेप घेणाऱ्यांपैकी अनेक जण त्याच्या घाशीरामसदृश प्रस्तुतीकरणावर बोट ठेवतात व थीमप्रमाणेच फॉर्मच्या दृष्टीनेही या दोहोंमध्ये साधर्म्य असल्याचं मान्य केलंच पाहिजे. संगीत, नृत्य, समूहदृश्य व लोककलाप्रकार यांचा वापर दोहोंमध्ये भरपूर आहे. घाशीराममधील दुय्यम पात्र व समूह प्रामुख्याने सामाजिक पार्श्वभूमी उभी करण्यासाठी वापरले जातात, तर 'अलवरा'मध्ये ते अनेकदा प्रतीकं प्रस्थापित करण्यासाठी योजिले जातात. घाशीरामच्या अनुकरणविषयक आरोपाबाबत एवढेच म्हणता येईल की आपल्या वा तत्सम फॉर्मच्या सर्व शक्यता–क्षमता घाशीरामने explore केलेल्या आहेत व ती वाट आता इतरांना बंद आहे असा दावा करणं धाडसाचं होईल. घाशीरामच्या अनुकरणातून प्रायोगिक, हौशी रंगभूमीवर अनेकवार उद्भवलेल्या निष्प्राण कवायतींचा विचार करता 'अलवरा डाकू'चा फॉर्म आशयाशी अधिक तन्मय झालेला आणि प्रयोगाचा एकदर अनुभव / परिणामावर कमी आक्रमण करणारा वाटला.

पुरुषोत्तम बेर्डे यांचं दिग्दर्शन-संगीत आणि गर्दीतही उठून दिसणारा, अलवरा गारुडी व बिंदा या भूमिकांतील कलाकारांचा अभिनव यांचाही अभिनंदनपूर्वक उल्लेख करायलाच हवा. □

---

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# शालिमार

## जगी या हाच चोरांचा पसारा

Indo–American सहकार्य व लक्ष्मी Judoon प्रॉडक्शनच्या नावाखाली कृष्णा शाह आणि त्यांचे काही देशी-विदेशी साथीदारं यांची एक सोनेरी टोळी 'शालिमार' नामक भिकार वस्तूंचे प्रदर्शन करीत सध्या प्रेक्षकांची लूटमार करीत आहे.

'शोले'च्या यशानंतर निघालेल्या बहुतारांकित चित्रपटांच्या मालिकेतील 'शालिमार' हे 'शोले'इतकेच बहुचर्चित नाव. शिवाय समुद्रापलिकडील आयातीमुळे त्याची हवाही बरीच तयार झालेली आणि केलेलीही.

पार कथेपासूनच परदेशी मंडळ भेटायला सुरवात होते. कथा कोणा तरी स्टॅनफोर्ड अमुक तमुकची आहे कथेत दिग्दर्शकाची वा अन्य कोणाची ढवळाढवळ झाली नाही, असे मानल्यास एक सर्वभावसंपन्न, सकलरसप्रधान हिंदी चित्रपट आणि एखादा निरनिराळचा भन्नाट अन् अफलातून चमत्कृतींनी भरलेला वैज्ञानिक गुन्हेगारपट यांचे अभिनव, हायब्रीड मिश्रण करून हे कथेचे रसायन स्टॅनफोर्डसाहेबांनी बनविले आहे. प्रारंभी भुरटा चोर बनून, एका महाशर्विलकांच्या सभेत प्रवेश करून आणि त्या साऱ्यांचा निःपात करून 'शालिमार' नावाचा १२१४ कॅरटचा (अबबब !) हिरा किंमत १३५ कोटी रुपये (अबबबब . ) हस्तगत करणाऱ्या प्रति जेम्स बाँड सी. बी. आय. एजंट कुमार (धर्मेंद्र) याची ही कथा. मग या कथेला प्रेम, वात्सल्य, कारुण्य, वीर, देशभक्ती इत्यादी इत्यादी रस-गुणांचे कलम आहे. या संपूर्ण चित्रपटात असंख्य विसंगती आहेत, असंख्य संदर्भ सुटलेले आहेत, विस्कळितपणा तर सुरवातीपासून शेवटपर्यंत तुमचा पाठलाग करतो; उदाहरणार्थ, माफियाचा सभासद असल्याने स्वरयंत्र काढून टाकल्यानंतरही जॉन सॅक्सनच्या घशातून मरताना आवाज निघतो. हा आवाज कसला, याचा उलगडा शेवटपर्यंत होत नाही. जॉन सॅक्सनच्या प्रेताला यथेच्छ रंगरंगोटी करून बेटावरील आदिवासी त्याला देव बनवितात. कारण ? कळत नाही. सर जॉन (रेक्स हॅरिसन) शेवटी टी. व्ही. पाहत असताना त्याचीच छायाचित्रे त्याला पडद्यावर दिसू लागतात. ही किमया कशी घडते ? क्षणात ड्रेनेजमध्ये, क्षणात दारात, क्षणात बागेत अशा प्रगटणाऱ्या माणसांमुळे सर जॉनच्या निवासस्थानाची नक्की रचना तर फारच विवाद्य आहे.

अशा अनुत्तरित समस्यांची आणखीही मोठी यादी करता येईल; पण या सगळयावर मिळणारे एकमेव अक्सीर जालीम रामबाण उत्तर 'सेन्सॉरने चित्रपट विचित्र कापल्यामुळे हे सगळे दोष आढळतात.' आता यावर तुम्ही 'परत चित्रपटाचे नीट संकलन का केले नाही ?' असा प्रतिप्रश्न विचारणार असाल तर चित्रपट पाहण्यास जाऊ नका !

दिग्दर्शक कृष्णा शाह यांची कामगिरी शून्य. संपूर्ण चित्रपट 'एक डोके नामक अवयवाचा विसर पाडणारा फॉर्म्युला हिंदी सिनेमा' या निम्नतम पातळीवर ठेवण्याचे कसबही त्यांना साधले नाही. चित्रपटाचा वेग तर मुंगीलाही लाजवील असा संथ असल्याने फक्त कंटाळा, आणखी कंटाळा, आणखी आणखी कंटाळा एवढाच फरक होत राहतो. चित्रपटातील शालीमारच्या चोरीसाठी व रक्षणासाठी वापरलेल्या निरनिराळचा युक्त्या–प्रयुक्त्या म्हणजे वेगवेगळचा जेम्सबाँडपटांचे वा तत्सम गुन्हेगारपटांचे मिश्रण आहे. जोडीला काही ट्रॅपीझच्या कसरतीचे खेळही पाहण्यास मिळतात.

कलाकारांमध्ये प्रथम पाहुण्यांचा विचार करू. सर जॉनची म्हणजे सर्व चोरांच्या बादशहाची भूमिका केली आहे रेक्स हॅरिसनने. यासाठी कादरखानच्या आवाजात हिंदी संवाद डब केले आहेत. डबिंगमधील फरक लपविण्यासाठी रेक्स हॅरिसनचे क्लोजअप जवळजवळ नाहीतच. शिवाय तो बोल-

ताना तोंडही फारसे उघडत नाही. इतके असूनही अत्यंत धूर्त, हुषार आणि तितकाच क्रूर, नाटकी सर जॅान रेक्स हॅरिसनने अत्यंत ताकदीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला. बाकीचे पाहुणे म्हणजे आनंदच होता. जॅान सॅक्सनला फारसा वाव नाही; तर काउंटेस बनलेली सिल्व्हिया माइल्स आपल्या लीला मिश्रांहून थोडीशी तरुण वाटली, इतकेच.

बाकी डॉ. दुबारीच्या भूमिकेत शम्मी कपूर आणि रोमिओ अय्यंगारच्या भूमिकेत ओ. पी. रल्हन उल्लेखनीय. धर्मेंद्र, झीनत अमान इत्यादी नेहमीच्या लोकांबाबत तोच तोच मजकूर किती वेळा खरडायचा ?

'शालिमार'ची गीते आनंद बक्षी यांची आहेत, एवढा जोडा पुरेसा.

संगीत राहुलदेव बर्मनचे. किशोरच्या आवाजातील 'हम बेवफा हरगिज न थे', लताच्या आवाजातील 'आईना वही रहता है' आणि उषा अय्यरचे 'चा चा चा' ही तीन गीते चांगली. रफीच्या आवाजातील 'जाग देवता' हे गाणे शब्द, सूर व चित्रण या तिन्ही दृष्टींनी हिंदी चित्रसृष्टीतील एक थोर विनोदी गीत ठरावे. फक्त चित्रपटात ते विनोदी गीत म्हणून न दाखविता गंभीर गीत म्हणून दाखवतात, हेच दुर्दैव !

चित्रपटाच्या छायाचित्रणापाशी कॅमेऱ्यामागे पुन्हा एक परदेशी चेहरा भेटतो–हार्वे जेनकिन्स. ही आणि हीच 'शालिमार'ची अपवादात्मक एकमेव जमेची बाजू. चित्रपटातील छायाचित्रण आणि रंगसंगती या तांत्रिक बाजू अतिशय उच्च. अगदी चित्रपटाच्या श्रेयनामावलीपासून याचा प्रत्यय येतो.

पण छायाचित्रण या एका गोष्टीसाठी हा प्रचंड लांबीचा अत्याचार सहन करणे केवळ अशक्य आहे. या प्रचंड रॅकेटच्या तडाख्यात सापडलेल्या प्रेक्षकाची आवस्था मात्र शेवटी 'करमणूक नको; पण शालिमार आवर !' अशी होते.

*

# डाकू और जवान

**क्या डाकू और क्या जवान।**
**अपने लिए दोनों महान ॥**

हे जर समजून घ्यायचं असेल तर पहा– सुनीलदत्त दिग्दर्शित 'डाकू और जवान.' चित्रपटाच्या नावात वा इतर कोणत्याही संदर्भात कुठेही डाकू असा उल्लेख आला की, सज्जन तरुण, त्याच्यावरचा सामाजिक अन्याय, मग त्या अन्यायाशी झुंज घेण्यासाठी त्याने डाकू बनणे हे सगळे रीळ भराभर नजरेसमोर उलगडतात. 'डाकू और जवान'-मध्ये हे सगळे आहेच, शिवाय या डाकूच्या मदतीला त्याचा सैनिक भाऊही आहे. हे दोघेजण आणि त्यांच्याबरोबरचे बाकी लोक चौ. चरणसिंगांप्रमाणे मधूनच आठवण झाली की 'जय किसान, हमारे खूनसे ये सोना, हमारी धरती' असा आरडाओरडा करायला लागतात. मग त्यांचा म्हातारा बाप आणि व्हिलन वगैरे मंडळी त्यांची समजूत घालून त्यांना गप्प करतात. शेवटी मात्र दोघेजण गप्प व्हायला अजिबात तयार नाही म्हटल्यानंतर बिंदू नायक खलनायिकेने एकाला पटकन गोळी घातली आणि स्वत: कायद्याच्या स्वाधीन झाली.

दिग्दर्शक सुनीलदत्त यांच्या कामगिरीबद्दलही काही वेगळे लिहिण्याची आवश्यकता नाही. त्यांनी आतापर्यंतचे बहुतेक सर्व डाकूपट नजरेखालून घातलेले असल्यामुळे मोडतोड व फिरून जोडाजोड याव्यतिरिक्त त्यांच्याकडे काहीच काम उरलेले नाही. तरुण पोरांच्या खोडचा, प्रेम, नायिकेवरील बलात्कार, तिची आत्महत्या, चितेपुढील प्रतिज्ञा, डाकूगिरी इत्यादी सर्व मैलाचे दगड कोणत्या ना कोणत्या जुन्या हिंदी डाकूपटाची याद देतात. चित्रपटातील खेडे, डाकूंचे ठिकाण, जमीनदाराची हवेली हे सगळेसुद्धा असेच पुन:प्रत्ययाचे दु:ख देणारे.

यात डाकू बनला आहे सुनीलदत्त. स्वत:च्या कामातसुद्धा मदर इंडिया, मुझे जीने दो, प्राण जाय पर इत्यादी आपल्याच भूमिकांचे मिश्रण आणि अवमूल्यन करण्याव्यतिरिक्त कोणताही बदल सुनीलदत्तने केलेला नाही. जवान आणि डाकूचा भाऊ (दोघे एकच) झाला आहे विनोद खन्ना. त्याचे काम ठीक. रीना रॉय छान दिसते व खूप दिसते. लीना चंदावरकर म्हणजे गोड चेहऱ्याचे पिप. बाकी मग ओमप्रकाश, अन्वर हुसेन, रणजित, बिंदू इत्यादी बरीच मंडळी शोभेला (शोभा आणण्याला अथवा करण्याला) होती.

संपूर्ण चित्रपटात आणखी एक जाणवलेली गोष्ट म्हणजे सर्व पात्रांना असलेले चिखलाचे जबरदस्त आकर्षण प्रत्येकाने काही ना काही निमित्ताने एक तर स्वत: चिखलात लोळण घेतली आहे वा दुसऱ्याला घ्यायला लावली आहे. शेवटी सुनीलदत्त मरून पडतो तोही चिखलातच. या चिखली रोगातून बहुधा 'शेवटी प्रत्येकाला या मातीतच जायचे आहे' किंवा धरतीबद्दलचे प्रेम असा काही तरी डायरेक्शनचा पॉइंट दाखवायचा असावा.

गीतकार आनंद बक्षी व संगीतकार लक्ष्मीकांत–प्यारेलाल. किशोर व आशाचे 'तोड सके तो तोड' हे एकमेव गीत ऐकणेबल.

जर खऱ्याखुऱ्या डाकूंना हे असले चित्रपट दाखवले, तर मला वाटते– त्यांच्या दोनच प्रतिक्रिया संभवतात. एक आपले हे विडंबन अत्यंत विनोदी वाटून त्यांना प्रचंड हसू येईल किंवा दोन– आपल्यासारख्या श्रेष्ठ डाकूजमातीची असली हिडिस चेष्टा करणाऱ्या त्या हरामखोर निर्माता-दिग्दर्शकांना ते गोळी घालून ठार करतील.

□